# Research Paper & Books Article Published –

## Session -2023-24

| Sr.N. | Title | Year | ISBN/ISSN | Impact Factor | Publication | Organized |
|---|---|---|---|---|---|---|
| 1) | मायाताई वासनिक यांच्या अंत:क्षोभ काव्यसंग्रहातील स्त्री जाणीव | 20 March 2024 | ISSN-2278-9308 | 8.632(SJIF) | B. Aadhar Single Blind Peer Reviewed and Refered Indexod Multidisciplinary International Research Journal | Yashvant Mahavidhyalaya Seloo Dist Wardha One day International Conference (Department Marathi ) |
| 2) | लेख - लीळाचरित्र: मराठी भाषेचा उत्कर्ष व भाषिक सौंदर्य | Oct 2023 | | | Prabhakar Publication,308 Siddhivinayak Apartment Latur | Shivaji Mahavidhyalaya Udgir Dist Latur |
| 3) | वाटा: पळवाटा नाटकातील विद्रोहात्मक संघर्ष | July-Sep. 2024 | ISSN-2231-573 | | UGC Care Listed Journal ......Prakashan 2024 | Dr.Shivaji Huse Kannad Dist Chhatrapati Nagar |
| 4) | अंत:क्षोभ माणूस जाणीवेच्या पातळीवर नेणीवेच्या आधाराशिवाय विचार करू शकत नाही असा उपाय सुचविणारी कविता : कवयित्री मायाताई वासनिक | 30 April 2024 | ISSN-2277-8071<br>SLI -7-399 | | Research Nebula and International Refereed Peer Reiewed and Indexed Quranterly Journal | Sant Tukaram Maharaj Mahavidhyalaya Chohotta Bazar Akot ,Dist. Akola |
| 5) | विषमतेच्या वृक्ष उध्वस्त करणारी गावागावाच्या वेशीवर सूर्य पेरणारी आंबेडकरी कविता: कवयित्री पुष्पा बोरकर | 27 July 2024 | ISBN-978-81-19931-43-9 | | Sai Jyoti Publication Itwari Nagpur UGC Sponsord Multi-Disciplanary National Conference | Vidhya bharati Mahavidhyalaya, Amravati |
| 6) | लेख - डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान | Feb. 2024 | ISSN-2278-9308 | 8.632(S) | B. Aadhar Single Blind Peer Reviewed and Refered Indexod | Dr. Ambedkar Studies Center S.G.B.Amravati University. |

CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Multidisciplinary International Research Journal | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| लेख - वैदर्भीय आंबेडकरी कविता: जागतिकीकारण वास्तव व दाहकता | 08 March 2024 | ISSN-978-81953708-7-0 | | Published by a Governmetal Recognized National Leval Publisher, surfec as per UGC Guideline | D.D. Pavan Mandhavkar Principal ,Indira Mahavidhyala Kalamb. |

12-Jan-2025

**Prof. Vikrant Krushnarao Meshram**
**HOD Marathi**
**8788711484**
Email.Id.vikrantmeshram1976@gmail
**Smt. Vatsalabai Naik Mahila Mahavidhyalaya Pusad,**
**Dist Yavatmal 445204**

CamScanner

Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## March- 2024

(CDLXV) 465 (A)

## समकालीन मराठी साहित्य (दशा आणि दिशा)



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
**Director**
**Aadhar Social Research & Development Training Institute Amravati**

**Executive Editor**
**Dr. Sandip B. Kale**
**Officiating Principal**
**Yeshwant Mahavidyalaya, Seloo Dist. Wardha**

**Editor**
**Prof. Bhushan D.Turankar**
**Assistant Professor**
**Dept. of Marathi**
**Yeshwant Mahavidyalaya, Seloo Dist. Wardha**

B.Aadhar

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

CamScanner

मायाताई वासनिक यांच्या अंत:क्षोभ काव्यसंग्रहातील आंबेडकरवादी स्त्रीवादी जाणिवा

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम,
मराठी विभाग प्रमुख, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय पुसद ,जिल्हा यवतमाळ,
९४०३४०५४९० vikrantmeshram1976@gmail.com

प्रस्तावना: १९६० च्या दशकात दलित साहित्याची निर्मिती झाली या दलित साहित्याला १९९० च्या दशकामध्ये आंबेडकरवादी साहित्य असे संबोधण्यात आले. आता दलित साहित्याच्या ऐवजी आंबेडकरवादी साहित्य ही संज्ञा शाश्वत स्वरूपात मान्यता प्राप्त झाली .मराठी सारस्वताच्या दृष्टीस या देशातील उपेक्षितांचे उपेक्षित जगणे त्यांना दिसले नाही किंवा दिसून न दिसल्यासारखे केले, खरंतर, उपेक्षितांच्या,पिढीतांच्या, अभावग्रस्त समूहाच्या उपेक्षित जगाचे निर्माते हेच खऱ्या अर्थाने....

या देशातील अस्पृश्यांच्या जीवनात जे दुःख, दैन्य ,दारिद्र्य शोषण, मनुष्य म्हणून हिनतेचे जगणे आले; या शोषितांच्या शोषणाचे जगण्याचे शासक मुळात हेच, या विषमतावादी समाज व्यवस्थेने या देशातील अभावग्रस्त समूहांचे मूलभूत हक्क नाकारलेत, ज्या महापुरुषाने या देशातील उपेक्षितांना अस्मिता मिळवून दिली, त्या महामानवाची जयंती साजरी केली म्हणून, स्वाभिमानाने जय भीम म्हणून स्वसन्मानाचे जीवन जगत असल्यामुळे, त्यांच्या झोपड्या पेटविणे ,जिवंत जाळणे, स्त्रीयांच्या नग्न धिंड काढणे, गावचे गाव, माणसाचे माणूसपण बेचिराख करणाऱ्या ,विषमतावादी समाजव्यवस्थेविरुद्ध डॉ. आंबेडकरांनी आपल्या वैचारिक सामाजिक आंदोलनातून विरोध करण्यास सुरुवात केली.

चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या माध्यमातून या देशातील अभावग्रस्त समूहाला स्वभान.. स्वसन्मान...स्व स्वावलंबन त्यांच्यात पेरला, उपेक्षित मानवत मनुष्यत्वाची जाणीव निर्माण केली. काळाराम मंदिर सत्याग्रह, अंबादेवी मंदिर प्रवेशाचे आंदोलन, असे अनेक सामाजिक, सांस्कृतिक आंदोलनातून अभावग्रस्त समूहामध्ये ऊर्जा पेरली/ रुजवली.

१९९० च्या दशकात दलित साहित्याचे नामाभिधान आंबेडकरवादी साहित्य झाले, आणि एका अर्थाने ते योग्यही झाले १४ ऑक्टोबर १९५६ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धम्माची दीक्षा नागपूरला दिली खऱ्या अर्थाने दलितांचे दलित्व तेव्हाच उध्वस्त झाले, आणि खऱ्या अर्थाने तेव्हापासूनच आंबेडकरवादी झालो .आंबेडकरवादी तो जो परमेश्वर, आत्मा, परमात्मा नाकारतो. आणि मानवाचे सर्वांग सुंदर जीवन बनवणाऱ्या बाविस प्रतिज्ञा स्वीकारतो. दलित होणे फार सोपे आहे मात्र आंबेडकरवादी होणे फार अवघड आहे.

आंबेडकरी चळवळ कार्यकर्ता आणि साहित्य याचे अन्यन्यो असे संबंध आहे, आणि अशा संबंधातून आंदोलनातून, मोर्चातून जातीय दंगलीतून ,नामांतराच्या लढ्यातून, माणसाचे मनुष्यत्व नाकारणाऱ्या विषयांतवादी समाज व्यवस्थेला सुरूंग लावून ठोकरीने उडवून आणि माणसाला एक निकोप, निर्लेप जीवन बहाल करण्यासाठी प्रक्रियेतून आंबेडकरी कवयित्री मायाताई वासनिक यांच्या अंत: क्षोभ कवितासंग्रहाचा जन्म झाला. आणि त्यांनी हा कवितासंग्रह आंबेडकरांच्या उरल्यासुरल्या सच्चा अनुयायांना समर्पित केले. याचा अर्थ फार गंभीर स्वरूपाचा आहे. आंबेडकरी समुदायात काहीच फक्त बोटावर मोजण्या इतपतच अनुयायी उरलेत बाकी सर्व स्वतः आंबेडकरी चळवळीतील बाजार बुणगे की ,काय हा चिंतेचा विषय त्यांनी सुरुवातीला उपस्थित केला आहे. स्वतंत्र मजूर पक्षापासून शेड्युल कास्ट फेडरेशन ते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राजकीय नेते यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी आपली आंबेडकराप्रति असलेली निष्ठा विकली असा त्यांचा आरोप करणे फार वास्तवादी आहे.कविता संग्रहाच्या प्रस्तावनेत प्रा. केशव मेश्राम भाष्य करताना म्हणतात," मायाताईच्या कवितात कुरकुर आणि किरकिर मुळीच नाही, तर मनाला सोलवटून काढणारा धारदारपणा आहे. कडव्या आंबेडकरवादी सैनिकाचा जोश आणि आत्मविश्वास ह्या कवयित्रीकडे आहे" मायाताई ह्या



CamScanner

आंबेडकरी चळवळीत लढवय्या कार्यकर्ते आहेत. आंबेडकरी समुहावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्या आंदोलन पुकारतात, आंबेडकरी चळवळीतील सक्रिय कार्यकर्त्या आहेत. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळाल्याच पाहिजे, ह्यासाठी ते इतर कार्यकर्त्यांबरोबर रस्त्यावर उतरतात,आंबेडकरी पुरुषांबरोबर आंबेडकरी महिलांची चळवळ उभी केली .आंबेडकरी समाजाला दारिद्र्याने पछाडले होते, गरीबी उपासमारी किती भयावह असते, मात्र अशा परिस्थितीत आपले पोटचे पिल्ले जगल्या पाहिजेत, उद्याचे भविष्य घडविण्यासाठी, शोषणमुक्त आंबेडकर समाज घडविण्यासाठी, असंख्य यातनाची समाधी मेंदूवर बांधून, काबाडकष्ट करू लागलेत. आपल्या पोटाच्या गोळयासाठी, त्यांच्या वर्तमान भविष्यासाठी ,त्यांची माय नावाची कविता काळजाला, मेंदुला विचार विन्मुख होण्यासाठी तर्कशुध्दतेच्या पातळीवर विचार करण्यास धीरगंभीर करते.

माय
माय
तुझ्या फाटक्या आयुष्याच्या
यातनांचा लेखाजोखा ,
माझ्या मेंदूत जसाच्या तसा करून ठेवला.

आई.. मायवर आंबेडकरी साहित्यात जेवढ्या कविता लिहिल्या आहेत, त्या प्रमाणात जगाच्या कोणत्याच साहित्यात नाही. माय हा विषय आंबेडकरवादी विचारवंतांच्या काळजाला पिळवटून टाकणारा आहे ,कारण आंबेडकरी समाजात आईच्या वाट्याला आलेली दुःख शाश्वत आहेत, दुःखाचे मूळ जरी एक असले तरी संदर्भ वेगवेगळे आहेत ,आपल्या चिल्यापिलांसाठी राबणे.. क्षणाक्षणाला मारणाला जवळ बोलूवने, शेवटी त्या तथागताला म्हणतात, मायच्या वेदनेला विराम दे !कारण माय च्या घामातून कवयित्रीच्या जगण्याचे संदर्भ वदललेत..

"आंबेडकरी महिलाची कविता ही स्व कडून समाजाकडे निघालेली आहे. हे माझे दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण आई म्हटल्यावर तिच्या वाट्याला येणाऱ्या यातना हाल अपेष्टा ,यामध्ये अनेक वर्ष ही कविता अडकलेली होती .ती तिथून बाहेर पडली आहे. ती रस्त्यावर आली आहे. चळवळीपर्यंत पोचलेली आहे. बाबासाहेबांपर्यंत पोहोचलेली आहे, आणि या सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, ती आंबेडकरवादी झालेली आहे. शेवटी आंबेडकरवादी आपण कोणाला म्हणतो, आंबेडकरवादी कोणालाही म्हणता येत नाही .मुळात आंबेडकरवादी होणे ही सगळ्यात अवघड गोष्ट आहे. म्हटलं तर ती एक जोखीम आहे. आपल्या दुःखाची नाळ जागतिक दुःखाशी जोडत असतो .तोच खरा आंबेडकरवादी". (उत्तम कांबळे:आंबेडकरी साहित्य पान नंबर ३)

" बाबासाहेबांच्या तेल चित्रांशी" संवाद या सदर कवितेतून कवयित्रीने बाबासाहेबांच्या तेल चित्राशी संवाद साधत असताना, हजारोवर्षाच्या विषमतावादी काळोखाला पेटवून, संघर्षात्मक आंदोलनातून उपेक्षितांच्या आयुष्यात उजेड पसरविला, धर्माधर्मात देवादेवात एकनिष्ठ झालेल्या समाजाला १४ ऑक्टोबर १९५६ बौद्ध धम्माची दीक्षा देऊन विषमतावादी धर्माच्या, जातीच्या, वर्णाच्या साखळदंड खेड्यातून मुक्त केले. विज्ञानवादी बौद्ध धम्म दिला. हरवलेल्या समुहाला चेहरा दिला ,अस्मिता दिली .डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या राजकीय पक्षातील नेते स्वतःच्या स्वार्थासाठी चळवळीशी व समाजाशी फितुरी केली. चेहऱ्यावर आंबेडकरी चळवळीचे विचाराचे खोटे मुखवटे पांघरून, समाजाची, चळवळीची नुकसान केले आणि आज आपल्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक चळवळीचे तुकड्या तुकड्यात विभाजन झाले. तुकड्या तुकड्यात विभाजित झालेले माणसं ही समाजासाठी चळवळीसाठी घातकच आहे ;धोकादायक आहेत, तरी मात्र चळवळ ही गतिशील असते. कोणी कितीही स्वार्थासाठी फितूर झाले तरी ती सामान्य माणसांच्या काळजात आजही जिवंत आहे. मोठ्या माणसांना विकत घेणे सहज सोपे असते ,ते स्वतःला केव्हाही कधीही


CamScanner

विक्री काढू शकतात, मात्र वस्तीतल्या निष्ठावांत सर्वसामान्य माणसांना विकत घेणे फार कठीण असते .प्रा. केशव मेश्राम म्हणतात," झोपडपट्टीतल्या सर्व सामान्य माणसांच्या खांद्यावर आंबेडकर चळवळ जिवंत आहे."(पहिले आंबेडकरी युवा साहित्य संमेलन २० मार्च २००५, बडनेरा ,उद्घाटकीय भाषण)

बाबासाहेब!
हजारो वर्षांच्या परंपरा पायी तुडविल्या
छप्पनच्या धम्मक्रांतीनुसार,
घरातील दगड धोंडे बाहेर फेकले,
तर ,
पण आमच्या कळपात वाघाचे कातडे पांघरून
मेंदूचे विघटन करणारी
शेळीचे फिरत राहिली
आणि अखेर कळपाचे
तुकड्या -तुकड्यात विभाजित झालो (कविता:बाबासाहेबांच्या तैल चित्रांशी संवाद :पान नंबर ३२)

सदर कवितेतून जशी त्यांनी चळवळीविषयी चिंता व्यक्त केली. त्याच पद्धतीने त्यांनी आशावाद देखील व्यक्त केला. येणारा काळ भिकट आहे. वर्तमानाची आपल्याकडून अपेक्षा आहे.आज लढू तर उद्या वाचू,अन्यथा सर्वनाश ठरलेलाच आहे .(आनंद गायकवाड) समाजाचे चळवळीचे सर्वनाश होऊ नये ,म्हणून आपण संघटित असलो पाहिजे, आपली निष्ठा प्रामाणिक असली पाहिजे, नाहीतर येणारी पीढी आपल्याला असंख्य प्रश्न करतील, तेव्हा अनुत्तरीत होण्यापेक्षा आज सजग राहणे महत्त्वाचे आहे. हा देखील निर्वाणीचा इशारा कवयित्रीने दिला आहे .डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे माणूस मर्त्य आहे ,त्याप्रमाणे त्याचे विचार देखील मर्त्य आहे .जर त्याचे विचार नेणारे शिष्यवर्ग नसेल तर, चांगले विचारही नष्ट होतात. एखादा रोपटं जगवायचा असेल तर त्याला दररोज खतपाणी घालून त्याची नीट निगा राखावी लागते. त्याचप्रमाणे चांगल्या विचारांचा देखील वारंवार प्रचार प्रसार करावा लागतो. त्यानुसार आचरण करावे लागते. तरच ते विचार चिरंतन स्मृतीत राहतात. आंबेडकरी विचार तत्त्वज्ञान जगभरातल्या सर्व पिढीत, शोषित ,वंचित घटकासाठी मुक्तीचे महाद्वार बनले आहे.( अंभोरे डॉ. आशाताई)

"मायाताई यांनी बाबासाहेबांवर लिहिलेली कविता, आरपीआयवर लिहिलेली कविता ,सावित्रीबाईवर लिहिलेली कविता वाचल्यानंतर असं वाटतं की खरोखरच त्या जागल्याची भूमिका करतात. बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान भ्रष्ट होता कामा नये. त्यासाठी त्या प्रयत्न करीत आहेत. बाबासाहेब तत्त्वज्ञान जाती-पातीत विभागले जाते कामा नये. सावित्रीबाईचे तत्त्वज्ञान आहे .हे अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी आहे. असं जेव्हा सांगण्याचा प्रयत्न एखादी कवयित्री करते तेव्हा, ती जागल्याची भूमिका करते. असा याचा अर्थ होतो" (उत्तम कांबळे १४ एप्रिल २००६ अंत:क्षोभ प्रकाशन समारंभातील भाष्य)

एकुणच मायाताई वासनिक यांनी आंबेडकरवादी महिलांच्या जाणिवा आपल्या कवितेच्या माध्यमातून प्रस्पुटीत केलेले आहेत. १४ एप्रिल २००६ डिंपल प्रकाशन ठाणे यांनी कविता संग्रह पूर्ण करून. या संग्रहात एकूण चाळीस कविता आहेत .सदर कवितासंग्रहाला तत्कालीन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. केशव मेश्राम यांची प्रस्तावना आहे .संग्रहाच्या विमोचनानिमित्ताने अध्यक्ष प्रा केशव मेश्राम,पू पूर्वाध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन विमोचक आंबेडकर साहित्यिक उत्तम कांबळे , प्रमुख अतिथी डॉ. मनोज तायडे, मराठी विभाग प्रमुख, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते गोविंद कासट,काव्यभाष्य डॉ. वसंत शेंडे


CamScanner

ISSN : 2278-9308 March-2024

,मराठी विभाग प्रमुख ,श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय अमरावती,यांनी भाष्य केले ..सदर काव्यसंग्रहाचा विमोचन सोहळा आशय: आंबेडकरी साहित्य व संस्कृती संवर्धन मंडळ बडनेरा -अमरावतीच्या वतीने२३सप्टेंबर २००६ला घेण्यात आले

संदर्भ ग्रंथ:

१)अंत:क्षोभ :गेडाम माया वासनिक, डिंपल पब्लिकेशन ठाणे ,पहिली आवृत्ती १४ एप्रिल २००६,

२)कांबळे उत्तम :आंबेडकरी साहित्य आशय: आंबेडकरी साहित्य व संस्कृती संवर्धन मंच द्वारा प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम, बडनेरा प्रतामावृत्ती ३ जानेवारी २००८

३) गायकवाड आनंद: राज्यस्तरीय आंबेडकरी साहित्य संमेलन उमरखेड , अध्यक्षीय भाषण

४) पिंपळापुरे केतन: आंबेडकरी विद्यार्थी साहित्य संमेलन, २९ नोव्हेंबर २००८अध्यक्ष भाषण

५)थोरात डॉ आशाताई :ग्रामीण आंबेडकरी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषण दिनांक दोन तीन फेब्रुवारी २०१९ अंजनगाव बारी, जिल्हा अमरावती .

६)मोरे प्रा. सतेश्वर :तिसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन वर्धा अध्यक्षीय भाषण

७) शेंडे डॉ .वसंत : आंबेडकरी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषण अकोला २६ एप्रिल २००९

८) खोब्रागडे प्रा. दीपककुमार :पहिले अखिल भारतीय आंबेडकरवादी साहित्य संमेलन ,चिमूर, जिल्हा. चंद्रपूर, अध्यक्षीय भाषण

९)अहिरे डॉ. प्रतिभा: पाचवे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन अकोला, दिनांक २०,२१ एप्रिल २०१३ अध्यक्षीय भाषण

१०)मेश्राम प्रा. केशव: उद्घाटकीय भाषण :पहिले आंबेडकरी युवा साहित्य संमेलन, वीस मार्च २००५ बडनेरा.

यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा द्वारा संचालित

# यशवंत महाविद्यालय, सेलू, जि. वर्धा

## मराठी विभाग

एक दिवसीय राष्ट्रीय परिषद

## समकालीन मराठी साहित्य

(दशा आणि दिशा)

# प्रमाणपत्र

प्रा./डॉ./श्री./श्रीमती प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम,

संस्था श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय पुसद

यांनी बुधवार दि. २० मार्च २०२४ रोजी समकालीन मराठी साहित्य (दशा आणि दिशा) या विषयावरील राष्ट्रीय परिषदेत

मायाताई वासनिक यांच्या अंतरूक्षोभ काव्यसंग्रहातील आंबेडकरवादी स्त्रीवादी जाणिवा

या विषयावर शोधनिबंध सादर केला असुन आय. एस. एस. एन. मान्यताप्राप्त बी.आधार या आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकेत प्रकाशित करण्यात आला आहे. करिता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

: समन्वयक :
प्रा. भुषण दे. तुरणकर
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
यशवंत महाविद्यालय, सेलू

: संयोजक :
प्रा. जयश्री र. देशमुख
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
यशवंत महाविद्यालय, सेलू

: आयोजक :
डॉ. संदीप बी. काळे
प्रभारी प्राचार्य
यशवंत महाविद्यालय, सेलू

CamScanner



संपादक – डॉ. नरसिंग अप्पासाहेब कदम
एम.ए.,पीएच.डी., नेट
प्रोफेसर, संशोधन मार्गदर्शक,
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग
शिवाजी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर

संशोधन कार्य – मराठी ग्रामीण कथेतील दलित जाणिवा

सहभाग – विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभाग

प्रकाशित ग्रंथ –
१. जीवनशैली (चारोळीसंग्रह)
२. निर्भया (कवितासंग्रह)
३. गोंडर (कवितासंग्रह)
४. धडक–बेधडक (वात्रटिका)

संपादक – श्रीराम गुंदेकर : व्यक्ती आणि वाङ्मय

सहसंपादक : जागतिकीकरण आणि मराठी साहित्य

संपादकीय सदस्य – लातूर – वसा आणि वारसा

प्रकाशित शोधनिबंध – राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये अनेक शोधनिबंध प्रकाशित.

पुरस्कार – साहित्यिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील विविध पुरस्काराने सन्मानित.



सहसंपादक – प्रा. अजित पुंडलिकराव जाधव
एम.ए., बी.एड्., नेट
अध्यापनाचा अनुभव – १५ वर्ष

संशोधन कार्य चालू – संत तुकाराम आणि महात्मा फुले यांच्या साहित्यातील वैचारिक अनुबंध

सहभाग – विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये सहभाग

प्रकाशित ग्रंथ – संतांचा खरा इतिहास

प्रकाशित शोधनिबंध – राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये अनेक शोधनिबंध प्रकाशित.

पुरस्कार – शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील विविध पुरस्काराने सन्मानित.

प्रभाकर पब्लिकेशन
३०४, सिद्धीविनायक अपार्टमेंट,
सुतमील रोड, लातूर मो. ८६००८८११२७
Website : www.prabhakarpublication.in

ISBN 978-93-92464-70-6

महानुभाव संप्रदाय : स्वरूप आणि विशेष
संपादक – डॉ. नरसिंग कदम
सहसंपादक – प्रा. अजित जाधव

# महानुभाव संप्रदाय स्वरूप आणि विशेष

संपादक – डॉ. नरसिंग कदम
सहसंपादक – प्रा. अजित जाधव



७) रस्त्याने जातांना आपल्या मार्गावरील स्थान डावलल्याने स्थाने डावलण्याचा दोष लागतो तो टाळावा.

८) स्थान नमस्कार करण्यास जातांना व नमस्कार करताना त्या त्या स्थानाची लीळा आठविणे हे अधिक लाभदायक आहे.

९) स्थाने वंदन किंवा नमस्कार करताना व करविताना धर्मबुद्धी असणे अत्यंत महत्वाचे आहे.

१०) स्थानाची अप्राप्ती भावने हे अत्यंत महत्वाचे व लाभदायक आहे.

११) ज्यांनी आपल्याला परमेश्वर चरणांकित स्थाने नमस्कार करविली, परिज्ञान केले, लीळा सांगितल्या अशा निमित्यांचे उपकार विसरू नये.

१२) स्थानांच्या ओटे बांधणीच्या वेळी ते स्थान कोणते आहे हे समजावे म्हणून ओटयांना विशिष्ट आकार दिले आहेत.

१३) प्रत्येक संत, महंत, भिक्षुक, वासनिक व नामधारकांनी स्थानांची दुर्दशा थांबवून त्यांचा जीर्णोद्धार केला पाहिजे.

**संदर्भसूची :-**


१) महानुभाव तीर्थस्थाने (५ वीआवृत्ती) - संकलन हंसराज खामनीकर महानुभाव साहित्य प्रकाशन

२) स्थान दर्शन (तृतीय आवृत्ती)- लेखक: हंसराज खामनीकर

३) आचारबंद संपादक डॉ. वि.भि.कोलते

४) रिद्धपूर महात्म्य संपादक डॉ.यू.म पठाण

५) महानुभावांचा आचारधर्म - संपादक डॉ. वि.भि.कोलते

६) लीळाचरित्र - संपादक डॉ. वि.भि.कोलते

७) श्रीचक्रधर चरित्र - लेखक डॉ. वि.भि.कोलते

८) श्रीक्षेत्र माहूरगडलेखक : केशवराज कपाटे


▲▲▲



४.

# लीळाचरित्र : मराठी भाषेचा उत्कर्ष व भाषिक सौंदर्य


प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम


**प्रस्तावना :**

महाराष्ट्राला नव्हे देशाला पुरोगामी आणि प्रतिगामी अशा विचारांची समृद्ध अशी परंपरा आहे. बुद्ध पूर्व काळापासून तर बुद्धोत्तर कालखंडात विचारांची, भाषेची समृद्ध व शाश्वत अशी परंपरा लाभली आहे. यामध्ये अनेक बोलीभाषा व लिपी लुप्त झाल्यात, आता त्या भाषा प्राथमिक ते उच्च शिक्षणामध्ये अभ्यासा पुरत्याच सीमित झाले आहेत जोपर्यंत भाषा बोलणारा शेवटचा माणूस जिवंत आहे; तोपर्यंत ती भाषा जिवंत आहे; किंवा जिवंत राहू शकते. भाषा बोलणारा संपला की, ती भाषा मृत पावते. म्हणून भाषा कोणतीही असो, ती टिकवणे व तिचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

बुद्ध पूर्व काळापासून तर बुद्धोत्तर काळापर्यंत व आजपर्यंत अनेक भाषा, संस्कृती, लिपी अभ्यासाच्या दृष्टिकोनातून शिकवल्या जातात. इसवी सन पूर्व १८६ बृहद्रथ याचा पुष्यमित्र शुंगाने वध केला. तेव्हापासून बुद्ध धम्म व त्यांची पाली भाषा व लिपी बहुतांशी व्यास गेली व वैदिक धर्माने, संस्कृतीने संस्कृत भाषेचे पाय जमिनीत घट्ट रोवले. बुद्ध पूर्व काळापासून तर तेराव्या शतकातील चक्रधर स्वामींच्या कालखंडात संस्कृत ही देवभाषा आहे. असा समज समाजातील सर्व सामान्य माणसांच्या मेंदूत करून ठेवण्यात आले. संस्कृत ही भाषा फक्त ब्राह्मण वर्गा पर्यंत सीमित होती.इतराने ती भाषा बोलण्याचा किंवा ऐकण्याचा प्रयत्न केला तर देह दंडाची शिक्षा देखील होती.

**मराठी भाषेची उत्पत्ती :** मराठी भाषेच्या उत्पत्ती संदर्भात अनेक विचारवंतामध्ये, अभ्यासकांत आणि तत्त्वज्ञानामध्ये मतभेद आहेत. शके ११९७(इ.स.१२७५) मध्ये संत ज्ञानेश्वराचा जन्म काळ मानला जातो.




CamScanner

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, अभंगाची गाथा, वैदिक धर्मातील गीता हा धर्मग्रंथ संस्कृत मधील तत्वज्ञानाचा ग्रंथ मानला जातो या वैदिक संस्कृतीतील गीता ह्या संस्कृत मधल्यातत्त्वज्ञानाच्या ग्रंथावर संत ज्ञानेश्वरांनी भाष्य केले, टीका केली आणि संस्कृती ही मर्यादित असलेली भाषा सर्वसामान्य पर्यंत त्यांच्या बोली भाषेत पोहोचवणे त्यांनी गीता या संस्कृतमधील ग्रंथातील सातशे श्लोकांवर ९००० ओव्यांची मराठीत टिका केली. ज्ञानेश्वरीचा रचनाकाळ शके बाराशे बारा इसवी सन १२९० असा आहे. ज्ञानेश्वरी मराठीतील पहिले भावार्थमंथ गीताभाष्य आहे. असं मांनणारा अभ्यासकांमध्ये एक वर्ग आहे, तर दुसरीकडे मराठी भाषेच्या उत्पत्तीच्या संदर्भात महानुभाव पंथातील चक्रधर स्वामी यांना स्वीकारणारा असा एक तत्त्वज्ञानाचा वर्ग आहे. महानुभाव पंथ काळात महाराष्ट्र हे विविध अंगाने संपन्न व समृद्ध असे राष्ट्र होते. इसवी सन १२७१ ते इसवी सन १३०९ ह्या कालखंडात रामदेवराव यादवांचे देवगिरी येथे राज्य होते. महाराष्ट्रात यादव घराण्याची राजवट होती. यादवांना भाषा सुलभ मराठी भाषेचा साहित्याचा, संस्कृतीचा, धर्माचा ,पंथाचा व संप्रदायाचा याच कालखंडात विकास झालेला आढळतो. ब्राह्मणांचे समाजात प्राबल्य होते. वेदशास्त्र पुराणातील अगदी हुशार आणि निशांत वर्ग म्हणून त्यांना महत्त्व होते. स्पृश्य अस्पृश्यता होती. समाजात चुकीच्या रूढी परंपरा होत्या. अज्ञान होते. सर्वसामान्य माणसं संस्कृत या भाषेपासून व लिपी पासून अनभिज्ञ होते. नव्हे तर त्यांना अनभिज्ञ ठेवण्यात आले होते .संस्कृत भाषेचे मक्तेदारी फक्त ब्राह्मणांकडेच होती. ज्ञानाची व अर्थाजनाची मक्तेदारी देखील त्यांच्याकडेच होती. अशा परिस्थितीत आपला पंथ हा सर्वसामान्य माणसांचा पंथ म्हणून ओळखला जावा, सर्व सामान्य माणसांना धर्माची चिकित्सा व अभ्यास करता यावे. या हेतूने चक्रधर स्वामींनी आपल्या अनुयायांना उद्बोधन केले होते की, जर महानुभव पंथ सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवायचा असेल तर, आपल्याला आपल्या पंथाची धर्मग्रंथ लोकभाषेत निर्माण केले पाहिजे. आणि तेव्हापासूनच महानुभव पंथातील संस्कृत ग्रंथ ही मराठीमध्ये अर्थात लोक भाषेमध्ये निर्माण झाली. मराठी भाषेसाठी महानुभव पंथाचे योगदान अनन्यसाधारण आहे. हे आपण येथे समजून घेतले पाहिजे.



बारावी शतकापासून तर एकोणिसाव्या शतकापर्यंत त्याही पलीकडे अनेक संतांनी, महापुरुषांनी, समाजसेवकांनी मराठी भाषेच्या माध्यमातून आपले तत्त्वज्ञान सर्वसामान्य लोकांच्या भाषेमध्ये अभिव्यक्त केले. त्यामुळे सर्वसामान्य जनसमुदाय त्या पंथाकडे संप्रदायाकडे, धर्माकडे आकर्षित होऊ लागले. आणि अशा पद्धतीने ती ती धर्म संप्रदाय, संस्कृती, पंथ सर्वसामान्य लोकांनी डोक्यावर घेतलीत.

**महाराष्ट्रात संतांची चळवळ व मराठी भाषा :** महाराष्ट्रातील संतांची चळवळ आणि महाराष्ट्राच्या मराठी भाषेची चळवळ ही एकाच वेळी सुरू झाली. संस्कृत ही वेदविद्या संपन्न लोकांची भाषा इसवी सन एकहजारच्या पूर्वी संस्कृत भाषेचे वर्चस्व होते. जवळपास सर्वच धर्मग्रंथ हे संस्कृत भाषेत रचले गेले होते. त्यातूनच विद्वान धर्मग्रंथावर भाष्य करीत होती .महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी विखुरलेला जनसमुदाय संस्कृत भाषेपासून अलिप्त होता. त्यामुळे त्यांच्यात एक प्रकारचा न्युनंगंडची भावना निर्माण झाली. नंतरच्या काळात चातुर्वर्ण्य व्यवस्था धक्के देत कर्माचे श्रेष्ठत्व समाजात रुजवण्यासाठी महाराष्ट्रात संतांची चळवळ सुरू झाली. कोणतीही चळवळ किंवा परिवर्तनाचा विचार हा नेहमीच शोषण व्यवस्थेविरुद्ध प्रतिक्रिया म्हणून जन्मास येतो. महाराष्ट्रात अनेक संप्रदायांनी आपापले विचार तत्त्वज्ञान मांडले .त्यापैकी महानुभाव पंथ एक होय. या पंथाने लोक भाषेचा स्वीकार करून लोकात मिसळले. त्यासाठी त्यांनी लोकभाषा मराठीचा स्वीकार केला. अकराव्या ते चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत म्हणजे महाराष्ट्रात यादवांचे राज्य असेपर्यंत चक्रधर स्वामी, नागदेवाचार्य, विठ्ठलाचे उपासक प्रवर्तक पुंडलिक नामदेव समकालीन संत आदींनी मराठी भाषेतून अभंग, काव्य, गद्य, टीका, शाहिरी, आदी वांङ्मय प्रकार हाताळून मराठी भाषेचा सन्मान वाढवला. महाराष्ट्राची भाषा म्हणून मराठीचा ध्वज फडकवून महाराष्ट्रातील वैदिक धर्मपंडितांनी गढूळ केलेले वातावरण बऱ्याच प्रमाणात स्वच्छ केले.

महाराष्ट्र मध्ये बाराव्या शतकाच्या व तेराव्या शतकाच्या कालखंडात ज्या काही संतांच्या चळवळी निर्माण झाल्या होत्या या चळवळीमध्ये दोन मतप्रवाह होते. एक द्वैत आणि दुसरा अद्वैत ही तत्त्वज्ञान स्वीकारणारे वेगवेगळी विचार परंपरा होती. प्रत्येक तत्त्वज्ञानाने आपला संप्रदाय, आपला,



CamScanner

धर्म आपला पंथ हा कसा श्रेष्ठ आहे हेच सांगण्याचे प्रयत्न केले आहे.

**लीळाचरित्र मराठी भाषेतील भाषिक सौंदर्य ग्रंथ :** लीळाचरित्र हा ग्रंथ मराठी भाषेतील आद्य चरित्र ग्रंथ आहे. या ग्रंथाची निर्मिती शके बाराशे आठ पूर्वी म्हणजेच संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीच्या अगोदर झालेली आहे "विवेक सिंधू" आणि "ज्ञानेश्वरी" हे मराठीतील काव्यग्रंथ आहेत तर "लीळाचरित्र" तत्कालीन मराठी गद्यात लिहिलेला चरित्र ग्रंथ आहे. लीळाचरित्र महानुभाव सांप्रदायिक अध्यात्मिक तत्व चिंतनाचा ग्रंथ असून त्या ग्रंथाच्या माध्यमातून तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, ऐतिहासिक महाराष्ट्राचे दर्शन घडते. त्याचबरोबर सामान्य लोकांचे भाषेतील म्हणी, वाक्प्रचार, शब्द, व्याकरण, वाक्यरचना असून जनसामान्यांच्या भाषेतून निर्माण झालेला ग्रंथ आहे. ग्रंथात केवळ चक्रधर स्वामींचे नव्हे तर तत्कालीन महाराष्ट्राचेही चित्र उमटले आहे. लीळाचरित्र ग्रंथाचे एकूण तीन विभागात विभाजन करण्यात आले आहे. त्यामध्ये एकांक, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे भाग असून एकांकात ७४ पूर्वार्धात ३५८ उत्तरार्धात ४८८ अशा लीळांचा समावेश करण्यात आला आहे. जवळपास या ग्रंथामध्ये ९५० लीळा आहेत. श्री चक्रधर स्वामींचा चरित्र मराठी भाषेतील आद्य चरित्र ग्रंथ आहे. लीळा चरित्र ग्रंथाने मराठी भाषेला केवळ समृद्धच केले नव्हे तर, मराठी भाषेवर भाषिक सौंदर्याचे अलंकार देखील चढविले आहे. लीळाचरित्र ग्रंथातील नऊशे पन्नास लीळा म्हणजे मराठी भाषेतील भाषिक सौंदर्य होय.

**निष्कर्ष :**

महानुभाव पंथ व वारकरी संप्रदायाचे मराठी भाषा समृद्ध करण्यात योगदान आहे. संत ज्ञानेश्वरांनी वैदिक धर्मातील गीता हा संस्कृत मधला तत्वज्ञानाचा ग्रंथ जनसामान्यांच्या भाषेत लिहून एक प्रकारे सर्वसामान्यांची भाषा जिवंत केली. चक्रधर स्वामींचे आदेशावरूनच महानुभावपंथातील पुढील ग्रंथ रचना हे लोक भाषेत झालीत. लीळाचरित्र या ग्रंथाचे मराठी भाषा समृद्ध करण्यात व भाषिक सौंदर्य वाढविण्यात योगदान आहे. बाराव्या शतकापासून तर एकविसाव्या शतकापर्यंत अनेक संत, महंत, पंथ, पंडित, शाहीर, महापुरुष, समाजसेवक अभ्यासक, तत्वचिंतक यांनी देखील आपल्या अभंगाच्या माध्यमातून काव्याच्या माध्यमातून वैचारिक लेख व ललित



लेखनाच्या माध्यमातून मराठी भाषेला एक प्रकारे भाषिक सौंदर्य बहाल केले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. लीळाचरित्र संपादक वि.भी.कोलते
२. लीळाचरित्र पूर्वार्ध उत्तरार्ध संपादक, शं.गो.तुळपुळे
३. श्री चक्रधर चरित्र: वि. भी. कोलते.
४. श्री गोविंद प्रभू चरित्र संपादक वि.भी. कोलते लीळाचरित्र एक अभ्यास व दि कुलकर्णी
५. तुकाराम व्यक्तित्व आणि कवित्व: डॉ किशोर सानप, डॉ. मनोज तायडे
६. श्री चक्रधर स्वामी लीळाचरित्र एकांक संपादक डॉ. बी. एन.पाटील, डॉ. शिरीष बी पाटील.



CamScanner



ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : १५ वे । अंक : तिसरा
जुलै ते सप्टेंबर : २०२४

## मराठवाड्यातील साहित्य विशेषांक


CamScanner

# अनुक्रमणिका


| मराठवाड्यातील आधुनिक साहित्य | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | शोधनिबंध शीर्षक | संशोधक/मार्गदर्शक | पृष्ठ क्र. |
| १ | मराठवाड्यातील कथांमधील स्त्री-पुरुष प्रतिमांचे स्वरूप | प्रा. उन्नती संजय चौधरी | ०९ |
| २ | मराठवाड्यातील ललित लेखन व वाटचाल | प्रा.डॉ.रामहारी मायकर | १७ |
| ३ | वाटा - पळवाटा नाटकातील विद्रोहात्मक संघर्ष | प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम | २२ |
| ४ | मूल्यगर्भ विचार मांडणारा मराठवाडी लेखक : प्रल्हाद लुलेकर | डॉ. अक्षय किशोर घोरपडे | २७ |
| ५ | मराठवाड्यातील कादंबरी | प्रा. तुपकरी शिवगीता बस्वलिंग | ३४ |
| ६ | मराठवाड्यातील कविता | राधाबाई बनकर, संशोधक विद्यार्थिनी<br>प्रा.डॉ. संतोष देशमुख, संशोधक मार्गदर्शक | ४० |
| ७ | मराठवाड्यातील साहित्य : एक आढावा | डॉ. पराग मुरलीधर सपाटे | ४६ |
| ८ | मराठवाडा भूषण रानकवी ना. धों. महानोर | प्रा. डॉ. गणेश गोपाळराव मालटे | ५४ |
| ९ | मराठवाड्यातील पहिले साहित्य शिरोमणी दलित आत्मकथन म्हणजे 'आठवणींचे पक्षी 'प्र. ई. सोनकांबळे : एक आढावा' | प्रा. डॉ. सिद्धार्थ कुंडलिक इंगोले | ६१ |
| १० | मराठवाड्यातील माध्यमांतरीत कादंबरी : दशक्रिया | डॉ. बाळू तिखे | ६६ |
| ११ | मराठवाड्यातील कवींचे बालकवितेच्या लेखनातील योगदान | डॉ. गजानन आनंता देवकर | ७१ |
| १२ | रेखा बैजल यांच्या साहित्याचे वेगळेपण | डॉ. विठ्ठल शंकर केदारी | ७८ |
| १३ | अर्थशास्त्रीय वास्तवाची मांडणी : 'टिश्यू पेपर' | डॉ. दीपक एम. भारती<br>डॉ. शिवराज काचे | ८४ |
| १४ | मराठवाड्यातील साहित्य समाज व संस्कृती | डॉ. विजया जितेंद्र राऊत | ९० |




CamScanner



# ‘वाटा - पळवाटा’ नाटकातील विद्रोहात्मक संघर्ष

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम

मराठी आणि संस्कृत साहित्यात नाटक परंपरा अधिक समृद्ध आहे. पूर्वापार परंपरेप्रमाणे चालत आलेली आहे, मात्र ती काही ठराविक वर्गसमूहाबद्दल सीमित आहे, लिहिणाऱ्यांचा वाचणाऱ्यांचा आणि पाहणाऱ्यांचा एक वर्ग आहे. एका ठराविक वर्गापुरते जातीपुरते लिहिणे व समाजातील जिवंत समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे आणि आपल्या कलाकृतीचा विषय न करणे हे आजपर्यंत मराठी सारस्वतांची परंपरा आहे.

दलित रंगभूमी, नाटक ते आंबेडकरी थिएटर अशी समृद्ध परंपरा लाभलेल्या आंबेडकरी नाटकातील लेखक नाटककार दत्ता भगत लिखित वाटा पळवाटा हे नाटक १९८६ मध्ये प्रसिद्ध झाले. या नाटकाच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, मानसिक समस्या आणि या समस्येवर घनाघात हल्ला करणारा अर्जुन नावाचा नायक उभा केला .तो संघर्ष करणारा असतो .अन्यायाविरुद्ध पेटून उठणार असतो. तोच स्वाभिमान आंबेडकरी समाजातील तरुणांमध्ये निर्माण झाला पाहिजे . हा विचार नाटककरांनी

या नाटकाच्या माध्यमातून आंबेडकरी समाजाला दिला आहे. वाटा- पळवाटा हे नाटक आशय आणि अभिव्यक्तीच्या माध्यमात अतिशय महत्त्वपूर्ण असे आहे .या नाटकाचा आशय अतिशय नाविन्यपूर्ण असा आहे. मराठी नाटककारणे समाजातील अस्पृश्य समूहाचे दु:ख, दारिद्र्य, उपासमारी, अन्याय, अत्याचार शोषणाकडे दुर्लक्ष केले. कलाकृतीत देखील दुर्लक्ष केले. त्यांच्या नाटकाचे व इतर साहित्य कलाकृतीचे ते विशेष झाले नाही. म्हणून जे वास्तव जीवन माझ्या वाट्याला आले, समूहाला आले, जे शोषण अन्याय, अत्याचार माणसाचे माणूस म्हणून सन्मानाने जगणे नाकारण्यात आले, हे वास्तवादी चित्र आंबेडकरी लेखकाने साहित्यकांनी आपल्या साहित्य कृतीतून मराठी साहित्यात जागतिक साहित्यात ताकदीने मांडलेत.अशाच एका नाटकातील संघर्ष व सन्मानाची लढाई, स्वावलंबनाची लढाई, आंदोलन, मोर्चा समाजाप्रती समर्पण अन्याय अत्याचाराविरुद्ध अतिशय ताकदीने पेटून उठणारा आणि विद्रोहाची भूमिका स्वीकारणारा नायक 'वाटा-पळवाटा' या नाटकाच्या माध्यमातून नाटककार दत्ता भगत यांनी अर्जुन या पात्राच्या माध्यमातून रेखाटले आहे. खरे तर तत्कालीन दलित समूहाने विभक्त होऊन संघर्ष करण्यापेक्षा संघटित होऊन अन्याय अत्याचाराविरुद्ध संघर्ष केला पाहिजे, हा संदेश त्यांनी नाटकाच्या माध्यमातून आंबेडकरी समाजातील तरुण वर्गांना दिले.

नाटककार दत्ता भगत यांनी अत्यंत ताकदीने, प्रभावीपणे दलितांच्या जीवनातील सवर्णा कडून होणारा अन्याय अत्याचार तर रेखाटलाच, परंतु त्याविरुद्ध आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत लढणारा नायक देखील ताकदीने उभा केला.नाटकातील कथानक आशय अभिव्यक्तीमुळे नाटक एका उंच शिखरावर जाऊन पोहोचले.नाटकातील अशयामुळे हे नाटक आंबेडकरी रंगभूमीच्या इतिहासातील एक अत्यंत प्रभावी व महत्त्वपूर्ण नाटक ठरले आहे.

महात्मा जोतिबा फुले यांनी' तृतीय रत्न' हे नाटक लिहिले व तेच आंबेडकरी रंगभूमीचे प्रेरणा झाले. आंबेडकरी चळवळी सोबत आंबेडकरी जलसा विकसित झाला .१९५५ साली.म.भि .चिटणीस यांचे 'युगयात्रा' हे नाटक प्रसिद्ध झाले.चौदा ऑक्टोबर १९५६रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीमध्ये नागपूरच्या दीक्षाभूमीवर या नाटकाचा सहा लाख प्रेक्षकांसमोर प्रयोग झाला. आणि असा ऐतिहासिक स्वरूपात आंबेडकरी नाटकाचा जन्म झाला. आंबेडकर नाटकाला समृद्ध आणि सशक्त आशी परंपरा आहे. त्यामध्ये म.भि.चिटणीस, भि.शी शिंदे, दत्ता भगत, प्रेमानंद गजवी, एन.जी .वाघ, प्रकाश त्रिभुवन, रुस्तम अचलखांब, भगवान हिरे, संजय पवार, भगवान सवई, प्रकाश दुपारे, अमर रामटेके, योगीराज वाघमारे, चंद्रकांत पवार, अविनाश डोळस, प्रकाश पुत्र, वसंत लोंढे, संजय जीवने, जॉनी मेश्राम, मंगेश बनसोड,सुरेश खोब्रागडे हे महत्त्वाचे लेखक, नाटककार आहेत.

'वाटा-पळवाटा' या नाटकाच्या माध्यमातून नाटककार दत्ता भगत यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाने प्रभावित झालेला तीन पिढ्यांचे वास्तव चित्र या नाटकामध्ये रेखाटले आहे. यामधली पहिली पिढी ब्रिटिश राजवटीतील आहे, प्रामाणिक आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांची आहे. पहिल्या पिढींच्या सशक्त खांद्यावर उभी असलेली दुसरी पिढी; ही शिकलेली आहे आणि काही प्रमाणात सत्ता संपत्ती प्राप्त केलेली आहे. मात्र तिसरी पिढी स्वातंत्र्योत्तर काळातील आहे परिवर्तनाची गती आणि अपेक्षा यातील व्यस्त प्रमाणामुळे संतापलेली आहे. ह्या तीन पिढ्यांचे चित्र या नाटकांमध्ये दिसून येते. या नाटकाचा पहिला प्रयोग नव नाटककार नाट्यमहोत्सव या नावाने दिनांक २५ ते२८ डिसेंबर १९८ दरम्यान थिएटर अकॅडमी तर्फे टिळक स्मारक मंदिर पुणे येथे या नाटकाचा पहिला प्रयोग सादर झाला. ह्या दोन अंकी सामाजिक समस्या प्रधान नाटकामध्ये लेखकांनी

दलित पूरग्रस्तांची चित्र रेखाटले आहे. या नाटकातील नायक अर्जुन हा सामान्य दलित कुटुंबातील तरुण, दलित समाजातील होणाऱ्या अन्याय अत्याचार विरुद्ध संघर्ष करतो. पूरग्रस्तांसाठी सरकारी निधीतून बांधलेली वसाहत तयार होते मात्र कॉन्ट्रॅक्टर पवार ती घरे देण्यास टाळाटाळ करतो, अशा परिस्थितीत अर्जुन त्या घरांची कुलुपे तोडून त्यांचा ताबा पूरग्रस्तांना देतो .

बुद्ध विहाराकरिता व पूरग्रस्तांसाठी बांधलेली घरे मिळवण्यासाठी अर्जुन नावाचा तरुण युवक त्यांच्याकरिता वर्गणी गोळा करण्याचे काम करीत असतो. पूरग्रस्त लोकांकरिता व त्यांच्या न्याय हक्कांकरिता अधिकाराठी तो संघर्ष करीत असतो. भीम नगरातल्या दलितांना तो मदत करीत असतो. या नाटकातील दुसरे महत्त्वाचे पात्र म्हणजे काका भीम नगरात मीटिंग करिता जाणार तेवढ्यात प्राध्यापक सतीश चे मित्र दासराव जोशी गुरुजी येतात ते काकांना 'नमस्कार' करतात तेव्हा काका त्यांना,' जय भीम 'म्हणतात, यावर दास गुरुजी काकांना म्हणतात. हो !'जय भीम' हा स्वाभिमान लेखकांनी काका या स्वाभिमानी पात्राच्या माध्यमातून आंबेडकरी समाजामध्ये एक प्रकारचे नवचैतन्य निर्माण केले. काका हे स्वाभिमानी पात्र आहे आपल्या समाजाबद्दल व धर्माबद्दल त्यांना अभिमान असतो. असाच अभिमान आंबेडकरी समाजामध्ये असावा हा देखील हेतू या नाटका मागचा असावा/आहे.

सतीश दास गुरुजींना राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातील काही गमती सांगतात. त्यातला एक प्रसंग म्हणजे गावातील सावकाराच्या घरी पाच मुलांचा समूह काम करीत असतो. सावकाराने मुलांसाठी चहा केला. त्यातला एक कप खास ठेवणीतला होता. तो दलितांसाठी असतो. तसा सतीश देशमुख हा काळा मुलगा होता त्याला दलित समजून सावकाराणे दलितांच्या ठेवणीतल्या कपात त्याला चहा दिला. संतापलेल्या देशमुखला सतीश म्हणतो, की देशमुख असा संतापू नकोस, शक्य असेल तर तुझ्या वाड्यातले जे असे ठेवण्यातले ग्लास किंवा कप असतील ना तर तेवढे फक्त फोडून टाक, संताप फार चांगलं असतं, पण केवळ संतापण्यासाठी नसते .त्याला योग्य वाट मिळणेही फार महत्वाचे असते. स्व- सन्मान नाटकाच्या माध्यमातून आंबेडकरी समाजात नाटककारांनी पोहोचविला आहे.

प्राध्यापक सतीश हा पवार साहेबांच्या शिक्षण संस्थेमध्ये प्राध्यापकाची नोकरी करीत असतो .याच पवार साहेबांनी सरकारी वसाहती बांधण्याचा परवाना मिळवला असतो. अर्जुनही पवार साहेबांच्या विरोधात बंड करून पूरग्रस्तांना वसाहतीचा हक्क मिळवून देण्याकरिता संघर्ष करीत असतो. सतीश व त्याची पत्नी हेमा हे दोघेही घरांमध्ये चर्चा करीत असतात, तेवढ्यात अर्जुन प्रवेश करतोय, सतीश सरांना,' जय भीम' ची सलामी देतो. अर्जुन तुला शंभर वर्ष आयुष्य आहे. आत्ताच तुझी आठवण केली होती .असे सतीश सांगतो यावर अर्जुन बोलतो. हरकत नाही सर शंभर वर्षे जगायला, माझी मुळीच हरकत नाही. हजारो वर्षांची साचलेली या समाजातील घाण धुऊन काढायची तर शंभर वर्षाचा आयुष्य देखील कमी पडतो आपण हा नव तरुणांमध्ये असलेला विद्रोहात्मक. आंबेडकरी विचार नाटक करांनी नाटकाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे.

भीम नगरातील माणसे पडक्या झोपड्यात राहत होती. पावसाळा तोंडावर आला आहे. मी त्यांची व्यवस्था केली. सगळ्यांचा विचार करायचा मी गुत्ता घेतला नाही. मला नाही करायचा सगळ्यांचा विचार,, मी माझ्या जातीपुरतं पाहणार बसं, शिकायचं ही नाही मला. बेकाराची संख्या काय कमी आहे, या देशात. शिकून तरी काय मिळणार आहे, कोण पुसणार आहे, माझ्या नावाचा जातीचा शिक्का, शिकलात की तुम्ही आंतरजाती लग्न केलं, दिलं का घर तुम्हाला दास गुरुजींना आणि सुधारकांसाठी एवढ्यात सतीश ची पत्नी हेमा येते व अर्जुन म्हणते दास गुरुजी काही बोलले का, अर्जुन



CamScanner

तुला, अर्जुन सतीश व हेमाला सांगतो, की" बुटाच्या ठोकरीने उडवतो असले गुरुजी, सुधारकीपणाचा आव आणणाऱ्यांच्या छाताडावर नाचायचं मला. आमच्या जातीच्या नावावर भाड खाणाऱ्यांचे बुरखे पाडायचे, मी माझा मार्ग निवडलाय सर. निवडलाय त्यांचे जास्तीत जास्त काय परिणाम होतील माहिती मला, हातात हातकड्या पडतील, तुरुंगात जावं लागेल, खडी फोडावी लागेल, एवढेच ना, तयारी आहे, माझी, हा जो क्रांतीकारी विचार नाटकाच्या माध्यमातून लेखकांनी आंबेडकरी समाजातील नव तरुणांमध्ये पेरण्याचा आणि त्यांना स्फूर्ती देण्याचा महत्त्वपूर्ण काम केले आहे

नाटककार दत्ता भगत यांनी या नाटकाच्या माध्यमातून आंबेडकरी नव तरुणांमध्ये एकत्रित होऊन लढण्याचा, त्याचबरोबर स्वाभिमान व सन्मान आणि अन्य अत्याचार विरुद्ध कितीही अविरोध असला तरी लढण्याची जिद्द अर्जुन या पात्राच्या माध्यमातून मांडली आहे गावात दंगल उसळलेली असते. संपूर्ण वातावरण तापलेले असते,पोलिसांच्या मोटारीचे आवाजा व्यापून जाते एवढ्यात तर अर्जुन धावत सतीश च्या घरी येतोय, कारण अर्जुन ला पकडण्याकरिता पोलीस येतात .कोणाला पळविण्याचा खोटा आरोप दास गुरु लावीत असतात. पोलिसांपासून बचाव करण्याकरिता अर्जुन सतीच्या घरी येतोय पण सतीश आधार देण्यास नकार देतो. अर्जुन सतीश सरांना विनंती करून म्हणतो, सर मी कुठल्याही गुन्हा केला नाही. पोलीस माझ्यामागे आहेत. मला आधार द्या, काका असते, तर त्यांनी मला वाऱ्यावर सोडले नसते. हे शब्द एकुण हेमा अर्जुन ला आधार देते. व आपल्या घरात अर्जुनाला घेते. पोलिसांपासून अर्जुनचा बचाव होतो .यावेळी हेमा अर्जुनाला म्हणते, काय झाले ते एकदा नीट सांग . सुटले सबळ पुरावे अभावी सर्व आरोपी,सर तुमचाही फार भरोसा आहे कायद्यावर, आमच्या वस्तीमध्ये दगडफेक झाली, जाळपोळ झाली, पण पोलीस आले नाहीत .खऱ्या गुन्हेगाराला पकडण्याकरिता, हा कुठला न्याय, सर, शेवंताला जाळणारे हेच आणि हेच माझ्यावर खुणाचा आरोप करणारे आहेत. मला माझा मार्ग सापडला सर, अटॅक इज द बेस्ट डिफेन्स-" संघर्ष शिवाय चळवळीला पर्याय नाही"

प्राध्यापक सतीश अर्जुन चे विचार एकूण त्याला म्हणतात थांब, अर्जुन तू ज्याला चळवळ समजतोस तो नुसता उद्रेक आहे. सर्वनाश. करणारा उद्रेक, सतीश सरांचे तत्वज्ञाना एकुण एकदाच अर्जुन अत्यंत तत्परतेने उत्तर देतो, सर.. जाळपोळ करणारे सही सलामत सुटतायेत, हा अन्याय नाही का, सर... चळवळीत उतरायचे तर किंमत मोजावी लागते, सर... असे तुम्हीच वारंवार सांगितलेत ना... किंमत मोजणे म्हणजे काय... नोकरी आणि प्रतिष्ठा सांभाळत... बदनामीला तोंड देणं? तेही फक्त चर्चा करून! एवढाच सोयीचा अर्थ लावत आला तुम्ही तुमच्या आवडत्या तत्वांचा!

आंबेडकरी समाजामध्ये आंतरिक जो कलह आहे . वैचारिक भेद देखील नाटकाराने तितक्याच ताकदीने नाटकात मांडले आहे. या नाटकातील काका नावाचे पात्र अत्यंत स्वाभिमानी, तितक्याच ताकदीने मोर्चा, आंदोलन करणारा अर्जुन, तोही अत्यंत स्वाभिमानी संघर्ष करणारा. आंदोलन करणारा.. दलितांच्या न्याय हक्कासाठी कारावास भोगणारा, तर प्राध्यापक सतीश हे आंबेडकरीच असतो. मात्र सतत ते अर्जुन ला मोर्चा काढण्यासाठी, आंदोलन करण्यासाठी मागे पडत असतात. कारण ते ज्या संस्थेत काम करतात ते पवार साहेबांची संस्था असते आणि ते त्यांच्यावर दबाव आणतात .कारण पूरग्रस्तांच्या वसाहतीचे कॉन्ट्रॅक्टर तेही पवारच असतात अर्जुन अतिशय जिद्दीने आणि एकटाच रस्त्यावर उतरतो मोर्चा काढतो आणि अशातच या मोर्चामध्ये काही जातीवादी लोक जाणीवपूर्वक त्या मोर्चाला दंगलीचे स्वरूप प्राप्त करतात .जाळपोळ, दगडफेक सुरू होते .आणि अशातच सेवंता नावाच्या मुलीला जाळल्या जाते. आणि तो आरोप देखील अर्जुनावर लावला जातो. ही जी परिस्थिती



CamScanner

आहे ही आज देखील फारशी बदलली नाही. आजही समाजामध्ये हे चित्र पाहायला मिळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या सामाजिक चळवळीच्या माध्यमातून आंबेडकरी समाजाला अस्मिता मिळवून दिली .माणूस म्हणून सन्मानाने जीवन जगण्याचा मार्ग सांगितला. बुद्ध धम्माची दीक्षा देऊन एक स्वतंत्र ओळख दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीवर निष्ठा ठेवून आंबेडकर समाजातील नागरिकांनी एकत्रित आले पाहिजे, संघटित झाल्या पाहिजे आणि अन्याय अत्याचार याविरुद्ध संघर्ष केला पाहिजे हा विचार त्यांनी नाटकाच्या माध्यमातून आंबेडकरी समाजाला दिला आहे. आणि अर्जुन या पात्राच्या माध्यमातून संघर्षाशिवाय चळवळीला पर्याय नाही. हा महत्त्वपूर्ण संदेश नाटककार दत्ता भगत यांनी आंबेडकरी जनतेला दिला आहे.

**निष्कर्ष**

वाटा पळवाटा या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे नवीन आशय,नाटकातील संघर्ष हा मानसिक वैचारिक पातळीवरच आहे. पूरग्रस्त आणि दलित यांच्यातील हा संघर्ष आहे. हे नाटक सामाजिक समस्या प्रधान आहे. संघर्षा शिवाय चळवळीला पर्याय नाही. जातीयवादी अर्जुन ला बदनाम करतात .खुणाच्या आरोपात अडकवतात, ते चित्र आजही रास्तपणे दिसत आहे. स्व: सन्मान,स्व: स्वाभिमान, स्व:स्वावलंब हे या नाटकाचे मूळ सूत्र आहे.


१) भगत दत्ता: वाटा पळवाटा

२) ढोके प्रा. विद्या राघोजी: आंबेडकरवाद आणि दलित साहित्य, आमोशी इंटरनॅशनल इंटर एप्रिल २०१८

३) खोब्रागडे प्रा. दीपककुमार :पहिले आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलन अध्यक्ष भाषण, नेल्सन मंडेला परिसर बँकॉक थायलंड

४) फडके भालचंद्र: दलित साहित्य वेदना व विद्रोह

५) डांगळे अर्जुन :दलित पँथर अधोरेखित सत्य, लोक वाङ्मय गृह प्रकाशन, एप्रिल २०२३

६) ढसाळ नामदेव :दलित पँथर एक संघर्ष, भाष्य प्रकाशन मुंबई पहिली आवृत्ती १५ फेब्रुवारी २०१४

७) खोब्रागडे डॉ. सुरेश दयाराम: आंबेडकर कविता आस्वाद आणि मिमांसा, प्रबुद्ध भारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय नागपूर १४ ऑक्टोंबर २०२०

८) मोरे प्रा. डॉ. सतेश्वर :तिसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन, वर्धा अध्यक्षीय भाषण

९) अहिरे डॉ प्रतिभा: पाचवे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन, अकोला दिनांक २०, २१ एप्रिल २०१३ अध्यक्षीय भाषण

१०) पिंपळापुरे केतन : आंबेडकरी विद्यार्थी साहित्य संमेलन, १९ नोव्हेंबर २००८, अध्यक्षीय भाषण

११) बनसोड डॉ. मंगेश :सातवे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन २६ फेब्रुवारी २०१७ यवतमाळ अध्यक्षीय भाषण

१२) थोरात डॉ. आशाताई :ग्रामीण आंबेडकरी साहित्य संमेलन, अध्यक्षीय भाषण, दिनांक दोन तीन फेब्रुवारी २०१९ अंजनगाव बारी जिल्हा अमरावती

१३) सपकाळ डॉ. अनिल: नाटक आकलन आणि आस्वाद, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ


ꕥ


**प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम,**

मराठी विभाग प्रमुख,

श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय पुसद,

जिल्हा. यवतमाळ.

मो. ८७८८७११४८४, ९४०३४०५४९०

Email : vikrantmeshram1976@gmail.com


ꕥꕥꕥ

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड – ४३१५१७

नॅक पुनर्मूल्यांकन **A+** (3.45 CGPA) श्रेणी

**मराठी भाषा व साहित्य विभाग** आणि **त्रैमासिक तिफण व भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, छत्रपती संभाजीनगर**

यांच्या संयुक्त विद्यमाने

## मराठवाड्यातील साहित्य

या विषयावर

एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

शुक्रवार, दि. १ मार्च २०२४,

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते, की प्रा./डॉ./श्री./श्रीमती **Prof.Vikrant Krushnarao Meshram**

महाविद्यालयाचे नाव **Smt.Vatsalabai Naik Mahila mahavidyalay Pusad district Yavatmal** यांनी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई मराठी विभाग व त्रैमासिक तिफण व भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ' मराठवाड्यातील साहित्य ' या विषयावरील एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात सक्रीय सहभाग घेतला, चर्चासत्र यशस्वी करण्यात महत्वपूर्ण सहकार्य केले. त्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| प्रा. डॉ. दिलीप भिसे | मा.प्रा.डॉ. शिवाजी हुसे | मा.डॉ. सर्जेराव जिगे | प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ |
|---|---|---|---|
| समन्वयक | सदस्य, मराठी अभ्यास मंडळ, डॉ.बा.आं.म. विद्यापीठ, छ. संभाजीनगर | अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, डॉ. बा. आं. म. वि. छ. संभाजीनगर | मुख्य संयोजक |
| | संपादक त्रैमासिक तिफण, छत्रपती संभाजीनगर | अध्यक्ष, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, छ संभाजीनगर | अधिसभा सदस्य, डॉ.बा.आं.म. विद्यापीठ, छ. संभाजीनगर |
| | | | प्राचार्य यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई |

Made for free with Certify'em

CamScanner

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

ISSN 2277-8071

J-Gate INDEXED

Indexed in the ICI Journals Master List

INDEX COPERNICUS INTERNATIONAL

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*

**ONE DAY NATIONAL INTER-DISCIPLINARY SEMINAR**

**On**

# INDIAN WOMEN: YESTERDAY, TODAY AND TOMMORROW

**30th April, 2024**
**Organized by**

## Sant Tukaram Maharaj Mahavidyalaya,

**Chohotta Bazar, Akot Dist. Akola**

*In Collaboration With*

## Sanskardeep Pratishthan,

**Akola**

**Special Issue Published on 30th April, 2024**

www.ycjournal.net
researchnebula@gmail.com

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
IMPACT FACTOR 7.399

| | | | |
|---|---|---|---|
| 50. | मनिषा गणेश झुरुंगे<br>पीएच.डी.संशोधक विद्यार्थी,<br>मराठी विभाग, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर<br>tgzurunge@gmail.com<br>मो.नं. 8408994362 | भारतीय स्त्रियांची सामाजिक स्थिती | 248 |
| 51. | संगिता सिताराम मसराम<br>संशोधक<br>प्लॉट नं. ७२, जैन पार्क, दारव्हा रोड,<br>लोहारा,ता.जि.यवतमाळ मो.नं.८००७९१९७७६ | मराठी नाटकातील स्त्री रुपे | 253 |
| 52. | प्रा. डॉ. संतोष लक्ष्मण राणे<br>विभागप्रमुख<br>जोशी- बेडेकर महाविद्यालय, ठाणे | भारतीय स्त्री आणि लिंग समानता | 257 |
| 53. | डॉ. मनिषा औटी - कवडे<br>ता. जुन्नर . जि. पुणे<br>मो. नं. ९९२१२३२२८५<br>manisha.kawade21@gmail.com | स्त्रियांच्या मराठी प्रवास वर्णनातील महिला सशक्तिकरण | 262 |
| 54. | प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम,<br>मराठी विभाग प्रमुख,<br>श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय<br>पुसद, जिल्हा. यवतमाळ,<br>vikrantmeshram1976@gmail.com<br>९४०३४०५४९० | अंतःक्षोभः माणूस जाणीवेच्या पातळीवर नेणीवेच्या आधाराशिवाय विचार करू शकत नाही असा उपाय सूचवणारी आंबेडकरी कविता: कवयित्री मायाताई वासनिक | 268 |
| 55. | डॉ. संदीप चपटे<br>शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय शिवळे. ता- मुरबाड, जि-ठाणे. मोबाईल नंबर- 9623723649 | 'भारतीय स्वातंत्र्यपूर्व काळातील 'स्त्री ' | 271 |
| 56. | प्रा.डॉ.गणेश मालटे<br>[मराठी विभागप्रमुख, श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली, जि. बुलढाणा<br>संदिपभाऊराव उन्हाळे<br>संशोधक विद्यार्थी | 'तहान' आणि 'बारोमास' या कादंबरीतील स्त्री जीवन | 276 |
| 57. | शुभांगी दामोदर बारवकर<br>स.प्रा. मराठी विभाग प्रमुख<br>कला व वाणिज्य महाविद्यालय राहू. | मराठी कविता आणि स्त्री | 280 |

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal In Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

One Day National Inter-Disciplinary Seminar
INDIAN WOMEN: YESTERDAY, TODAY AND TOMORROW
On 30th April, 2024 @
Sant Tukaram Maharaj Mahavidyalaya, Chohotta Bazar, Akot Dist. Akola
*In collaboration with*
Sanskardeep Pratishthan, Akola

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम,
मराठी विभाग प्रमुख,
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय पुसद, जिल्हा. यवतमाळ,
vikrantmeshram1976@gmail.com
९४०३४०५४९०

## अंतःक्षोभः माणूस जाणीवेच्या पातळीवर नेणीवेच्या आधाराशिवाय विचार करू शकत नाही असा उपाय सूचवणारी आंबेडकरी कविता: कवयित्री मायाताई वासनिक

**ABSTRACT**

मराठी साहित्य प्रांतात आंबेडकरी कवितेने स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध केले आहे. ज्या सामाजिक पर्यावरणात या कवितेची निर्मिती झाली ते सामाजिक पर्यावरण निखळ मानवी संस्कृतीच्या निर्मितीसाठी सुसंगत नाही. याची जाण पहिल्यांदा आंबेडकरी कवितेने सांस्कृतिक क्षेत्राला करून दिली; आणि समग्र मानव्याच्या आग्रह नव्या मानवीमूल्याधिष्ठीत समाजरचनेच्या निर्मितीसाठी संबंध व्यवस्थेचे विरोधात ही कविता उभी ठाकली. अर्ध शतकापेक्षा कमी आणि पाव शतकापेक्षा थोडे जास्त वय असलेल्या या कवितेचा पूर्वीपेक्षा आज बाज थोडा संयत असला तरी पिळदार आहे. या उलट मानवी जीवनाचे आणि समाजाची आकलन अधिक गंभीरपणे आणि तेवढ्याच जबाबदारीने ही कविता करीत आहे.

समाज बदलतो; तसाच जीवनाकडे पाहण्याचा माणसांचा दृष्टिकोनही बदलतो. या बदलत्या समाजवास्तवात बदलणाऱ्या सामाजिक दृष्टिकोनातून मानवी जीवनाचा बदलता पट न्याहाळणे, त्याचे समकालीन नैतिक निकषांच्या आधाराने आकलन करणे, मानवी जीवनाशी असलेल्या त्यांच्या सुसंगत किंवा विसंगत नात्यांचे विश्लेषण करणे या संबंध चिंतन प्रक्रियेतून कवितेला आवश्यक असणारा आशय एका विशिष्ट आकृतीबंधात ढाळणे यातून कवी म्हणून स्वतःची प्रतिक्रिया व्यक्त करणे ही कवीगत पातळीवर घडणारी कवितेच्या संदर्भातली प्रक्रिया आंबेडकरी कवींच्या संदर्भात एका तत्वधिष्ठित नैष्ठिक निकषांवर आधारित असते. त्यामुळे या कवितेचा विचार करताना कविता म्हणून विचार करावाच लागतो. त्याचबरोबर ही कविता जो सामाजिक आशय अभिव्यक्त करते तो तात्विक पातळीवर आंबेडकरी आहे की नाही याचाही प्रकर्षाने विचार करावा लागतो. हा विचार कवीचा जन्मगत जातीधिष्ठीत नसतो तर त्याने त्याच्या कलात्मक जाणीवच्या संस्कारासाठी कुठला विचार स्वीकारला हे महत्त्वाचे असते. आंबेडकरी कविता तत्वतः आंबेडकरवादाचा स्वीकार करते. हे सर्वसिद्ध आहे. हाच तिच्या आंबेडकरी असण्याचा निकष आहे आशयाच्या पातळीवर तो सिद्ध व्हावा एवढीच अपेक्षा आहे.

मनुष्यत्व हे आंबेडकरी कवितेचे मूलसूत्र आहे. संबंध मानवी जीवन / मानवी समाज ज्या प्राणीत्वापासून स्वतःची सुटका करून घेऊ इच्छितो, त्याच्या विकासासाठी उत्थानासाठी आणि जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या नव्या जीवनविषयक शैलीचा हा आधार आहे. ज्या ज्या वेळी हा आधार नाकारल्या गेला किंवा या आधारावर आघात झाला त्या त्या वेळी त्या त्या पर्यावरणात

मानवीजीवन मानवी समाज आणि मानवी संस्कृतीचा विनाश झाला ह्या नाश पावलेल्या संस्कृतीला अडीच हजार वर्षांपूर्वी तथागताच्या सम्यक सामाजिक विचाराने नव्याने उभे केले आणि त्यानंतर आता गेल्या पन्नास वर्षांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरनी हाच मनुष्यत्वाचा विचार भारतीय माणसाच्या समोर ठेवून परत एकदा या संस्कृतीला विकृत होण्यापासून परावृत्त केले. या सांस्कृतिक पर्यावरणात आंबेडकरी कविता जन्मली, वाढली आणि विकास पावली आज तीन पिढ्यानंतर चवथी पिढी पुढे येत आहे. प्रत्येक पिढीचे स्वतःचे एक वेगळेपण आहेच, परंतु एका आंतरिक सूत्रात त्या बांधल्या गेल्या आहे त्यामुळे त्याच्या कवितांमधील आशयाचे तपशील बदलले असले तरी सूत्र मात्र एक आहे.

आंबेडकरी कविता आंबेडकरी आंदोलनाचा परिपाक आहे. या आंदोलनात सहभागी झालेला कवी; कवी होताच त्याबरोबर तो आंदोलक ही होतो आजही प्रत्यक्ष आंदोलनात ज्या कवयित्री सहभागी आहेत. त्यात माया वासनिक यांच्या नावाचा गौरवाने उल्लेख केला जातो. २००६ला त्यांचा कवितांचा संग्रह प्रकाशित झाला. मुंबईच्या डिंपल पब्लिकेशन ने प्रकाशित केला. एकाहत्तर पृष्ठांच्या या कवितासंग्रहामध्ये त्यांच्या चाळीस कवितांचा समावेश असून या संग्रहाला नाशिक येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष प्राध्यापक केशव मेश्राम यांची विवेचक प्रस्तावना लाभली आहे.

माया वासनिक गेल्या तीन दशकांपासून आंबेडकरी काव्यप्रांतात काव्य लेखन करीत आहेत. सामाजिक कार्यकर्तेचं जगणं त्यांनी स्वीकारलं त्यामुळे पारंपरिक त्यांच्या वाट्याला आलेला अनुभव त्यांच्या कवितेतून जाणवत असला तरी स्त्रीत्वाचा वेगवेगळ्या पातळ्यांवर एक निखळ स्त्री म्हणून घेतलेल्या अनुभवांचे भावोत्कट दर्शन त्यांच्या कवितांमधून घडणे स्वाभाविक आहे. सावित्री आणि रमाईची लेक म्हणून त्यांच्याशी असणाऱ्या नात्यातल्या सुखाचा आणि दुःखचा; त्याहीपेक्षा गेल्या पन्नास वर्षापासून ज्या एका वेगळ्या जाणीवासह इतला पूर्वास्पृश्य माणूस जगत आहे. बौद्ध म्हणून त्याच्या वाटेला आलेले इतरांच्या तुलनेत वेगवेगळ्या सामाजिक जगण्याचे, त्यांच्या चळवळीचे, त्या सामाजिक अस्तित्वाचे अनोखेपण आणि यातून जाणवणारे त्यांच्या वेगळेपणाचे संदर्भ हा मूलतः त्यांच्या कवितांचा आशयाधार आहे.

गेल्या पन्नास वर्षात समाज बदलला या बदलत्या समाजातल्या जाणीवांमध्ये नेमका काय बदल झाला याचा शोध घेण्याचा प्रयत्न अंतःक्षोभ मधून केला गेला आहे.

मायभूमीत जन्माला आलो तरी
मी माझ्या घरात नाही
इथल्या कोल्हया कुत्र्यांना तळ्याचं स्वातंत्र्य परंतु मला तिथे जाण्याचे स्वातंत्र्य नाही (मी बोलतेय) हा पूर्वानुभव तर, मी चळवळ आणि वस्ती अनेकांनी त्याला वेगवेगळे संदर्भ दिले, अन् सोयींप्रमाणे अर्थ लावले कित्येकाच्या आयुष्याची चिरफाड झाली काहींनी मात्र निष्ठेनी प्राणवायू दिला काहींनी झोंबाझोंबी केली काहींनी भूतकाळाच्या नोंदी, आपल्या हृदयावर करून ठेवल्या. परंतु मात्र काही, आजही निवडुंगासारखे जगत आहे (मी चळवळ आणि वस्ती) हे समकालीन वास्तव आपल्या व्यक्तिगत अनुभवातून साकारलेलं. समाजात जगताना संबंध मानवी जमात एकाच धाग्यात बांधली गेली असली तरी प्रत्येकाचे व्यक्तिगत संबंध या धाग्याने बांधले जावे अशी अपेक्षा असते. ती असतणे स्वाभाविक आहे. केव्हा केव्हा व्यक्तिगत पातळीवरचे जगणे, विचार करणे हे प्रासंगिक पातळीवरच्या आलेल्या क्षणिक अनुभवाच्या प्रभावातून सिद्ध होत असते, यावरून माणसाच्या सामाजिक जगण्याचा विचार करणे आणि तो प्रमाण मानणे तेवढे बरोबर नसले; तरी माणूस जाणिवेच्या पातळीवर नेणीवेच्या आधाराशिवाय विचार करू शकत नाही. नेणीव ही अनुभवाच्या विचाराच्या आकलनाच्या ताण्याबाण्यातून संस्करीत होत जाते. तो संस्कार आणि त्या संस्कारप्रति असणारे माणसाचे / समाजाचे गांभीर्य याचा प्रत्यय त्यातून येतो. तो संस्कार आंबेडकरी असेल तर हे वास्तव आपल्याला दुर्लक्षित करून चालत नाही. त्याचा परिणाम- वाघिणीच्या दुधासाठी संघटित होईन संघर्ष करीत राहिलो पण आमच्या कळपात वाघाचे कातडे पांघरून मेंदूचे विघटन करणारी शेळीचे फिरत राहिली आणि अखेर कळपाचे तुकड्या तुकड्यात विभाजित झालो (बाबासाहेबांच्या तैलचित्राशी संवाद) अशाप्रकारे गेले अनेक दिवसांपासून ऐक्य हा आंबेडकरी चळवळी समोरचा कळीचा

प्रश्न झाला आहे. मूलतः माणसांच्या एक्केपेक्षा त्यांच्या नेत्यांचे ऐक्य हाच मुद्दा असला तरी त्याचा सामाजिक चळवळीवर होणारा सकारात्मक परिणाम हा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे सतत फुटणाऱ्या नेत्यांना एकत्रित आणने, त्यांचे एकत्रित येणे आणि फुटणे. पुन्हा त्याच चर्चा तेच वादविवाद असा सगळाच गोंधळ राजकीय पातळीवर आहे सामाजिक चळवळीत वावरणाऱ्या कार्यकर्त्यांसमोर हा प्रचंड वैताग आहे या नेत्यांचे व्यक्तिगत अहंकार आणि राजकीय स्वार्थ हा ऐक्यासमोरचा प्रमुख अडथळा असून त्यावर मात करणे त्यांना कधी जमणार नसल्याने ऐकृयासंबंधी अनेकांनी अनेक उपाय सूचित केले आहे परंतु माया वासनिकांनी सुचविलेला उपाय मात्र वेगळाच आहे.

फुटेल त्याला जोडा अन् फुगेल त्यास मिठाच्या गाडग्याने शेका ( बाबासाहेब, माझं एक दुःख) ऐक्यासाठी सुचविलेले या उपायाला प्रत्यक्षात अमलात आणता येणार की नाही. हा प्रश्न महत्त्वाचा नाही. परंतु ज्या पातळीवर हा वैताग कारण नसताना चळवळीच्या माथी मारला जातो त्यावरील ही एक जळजळीत प्रतिक्रिया आहे. आंबेडकरी कविता ज्या प्रश्नांना सामोरे जाते त्या प्रश्नाचे स्वरूप साधारणतः सारखे असले तरी अभिव्यक्ती आणि तपशील यातील वेगळेपण माया वासनिक यांच्याही कवितेत दिसून येते. जन्माधिष्टीत दुःख, चळवळीशी दुभंगलेपण, जेनेत्यांचा अप्रामाणिकपणा, अन्याय, अमाणूष अत्याचार, आपल्यालाच माणसाकडून होणारी आपली फसवणूक निष्ठाहीन स्वार्थी माणसाचे दुटप्पी चेहरे अशा एक ना अनेक बाबींचे संदर्भ या कवितेत असले तरी कवितेत स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचार, स्त्री म्हणून वाटायला आलेले शोषण आणि त्यापासून आता सुटका नाही अशा परिस्थितीत शरण जाणाऱ्या कविता नाहीत. याउलट स्त्री असली तरी मीही चळवळीतील एक वळवळी आहे. ही माझी जबाबदारी आहे अशी जाणीव अंतःक्षोभ मधून साकार होताना दिसते. आंबेडकरी चळवळ मुक्तीचा विचार करताना स्त्री किंवा पुरुष असा स्वतंत्र विचार करीत नाही तर या मुक्तीच्या मार्गातले दोघेही समान वाटेकरी आहेत. आणि समान सहभागातून ही जबाबदारी त्यांना पेलायची आहे. अंतःक्षोभ हा गेल्या चाळीस-पंचेचाळीस वर्षातील नव्या जुन्या प्रासंगिक कवितांचा एकत्रित संच असला तरी अनेक समकालीन संदर्भ त्यात विखुरलेले आहेत. बाबासाहेबांशी होणाऱ्या संवादातून आणि रमाई सावित्रींच्या निमित्ताने हे संदर्भ अआशयबद्ध झाले आहे. गेल्या चाळीस पंचेचाळीस वर्षापासून सातत्याने काव्य लेखन करणाऱ्या आंबेडकरी कवितेचा हा कवितासंग्रह मराठी कवितेच्या प्रांतात महत्त्वपूर्ण आहे. ही कवितेतील आणखी एक भर नाही तर गेल्या तीन दशकातील आंबेडकर कवितेचा हा चेहरा आहे.

संदर्भ ग्रंथः

१) अंतःक्षोभ : गेडाम माया वासनिक, डिंपल पब्लिकेशन ठाणे, पहिली आवृत्ती १४ एप्रिल २००६,

२) कांबळे उत्तम : आंबेडकरी साहित्य आशयः आंबेडकरी साहित्य व संस्कृती संवर्धन मंच द्वारा प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम, बडनेरा प्रतामावृत्ती ३ जानेवारी २००८

३) गायकवाड आनंदः राज्यस्तरीय आंबेडकरी साहित्य संमेलन उमरखेड, अध्यक्षीय भाषण

४) पिंपळापुरे केतनः आंबेडकरी विद्यार्थी साहित्य संमेलन, २९ नोव्हेंबर २००८ अध्यक्ष भाषण

५) थोरात डॉ आशाताई: ग्रामीण आंबेडकरी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषण दिनांक दोन तीन फेब्रुवारी २०१९ अंजनगाव बारी, जिल्हा अमरावती.

६) मोरे प्रा. सतेश्वर : तिसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन वर्धा अध्यक्षीय भाषण

७) शेंडे डॉ. वसंत : आंबेडकरी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषण अकोला २६ एप्रिल २००९

८) खोब्रागडे प्रा. दीपककुमार : पहिले अखिल भारतीय आंबेडकरवादी साहित्य संमेलन चिमूर, जिल्हा. चंद्रपूर, अध्यक्षीय भाषण

९) अहिरे डॉ. प्रतिभाः पाचवे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन अकोला, दिनांक २०,२१ एप्रिल २०१३ अध्यक्षीय भाषण

१०) मेश्राम प्रा. केशवः उद्घाटकीय भाषण: पहिले आंबेडकरी युवा साहित्य संमेलन, वीस मार्च २००५ बडनेरा.

Sr. No. 025

# संत तुकाराम महाराज महाविद्यालय

चोहोट्टा बाजार, ता.अकोट जि.अकोला आणि

# संस्कारदीप प्रतिष्ठान,अकोला

## CERTIFICATE

This is to certify that, प्रा.विक्रांत कृष्णराव मेश्राम, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद

has Presented a Paper Entitled अंत:क्षोभ" माणूस जाणिवेच्या पातळीवर नेणिवेच्या आधाराशिवाय विचार करू शकत नाही, असा उपाय सुचवणारी आंबेडकरी कविता" : कवयित्री: मायाताई वासनिक

In National Conference on

आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र

भारतीय स्त्री

काल,आज आणि उद्या

jointly organized by the Sant Tukaram Maharaj Mahavidyalay & Sanskardeep Pratisthan, Akola, Maharashtra held on 30th April, 2024.

Sumit Joshi
Coordinator, National Conference

Prof. Devanand Gawande
Coordinator, National Conference

CamScanner


# Conference Proceedings

**UGC Sponsored Multi-disciplinary**
**National Conference on**

## *Feminism in 21st Century: Breaking Barriers; Shaping Futures*

## २१ व्या शतकातील स्त्रीवाद : सीमोल्लंघन करूया; भविष्य घडवूया

**Date : Saturday, 27th July, 2024**



**:: Organized by ::**


Vidya Bharati Shaikshanik Mandal's

# Vidya Bharati Mahavidyalaya, Amravati

Re-accredited with Grade 'A' by the NAAC (CGPA 3.23 - Third Cycle)
College with Potential for Excellence (CPE Status Thrice by the UGC)
Star College Status by DBT, New Delhi, Mentor College under Paramarsh by UGC
Identified as Lead College by S.G.B. Amravati University, Amravati



**ISBN : 978-81-19931-43-9**



CamScanner

23

# विषमतेचे वृक्ष उध्वस्त करणारी गावा गावाच्या वेशीवर सूर्य पेरणारी आंबेडकरी कविता : कवयित्री पुष्पा बोरकर

**प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम,**
मराठी विभाग प्रमुख, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय पुसद, जिल्हा. यवतमाळ, ८७८८७११४८४

**प्रा: डॉ. गजानन बनसोड,**
मराठी विभाग प्रमुख, मराठी संशोधन केंद्र, विद्याभारती महाविद्यालय अमरावती,

**प्रस्तावना:**

इसवी सन पूर्व तीनहजार वर्षापर्यंत या देशातील एकूणच जगाच्या पाठीवर स्त्रीमुक्त होती, तिच्या पंखात स्वप्न होते, ती स्वावलंबी आणि स्वयंप्रकाशित होती. इसवी सन पूर्व पाचव्या सहाव्या शतकापर्यंत स्त्री पूर्णत: अध:पतीत केली गेली होती. यावेळी ती केवळ भोगवस्तू मानली जात होती. स्त्रीच्या स्वातंत्र्याचा सूर्य यावेळी पूर्णपणे मावळून गेला होता. नेमकं याचवेळी बुद्धाने स्त्रीच्या जीवनात क्रांती घडविली, बुध्द बुद्धिवाद विचारवंत होता. तो वर्ण व्यवस्थेचा विरोधक होता. त्याला कोणतेही प्रकारची विषमता मान्य नव्हती. तो सामाजिक न्यायचा उद्घाता होता.

स्त्री मुक्तीच्या विचार असा प्रारंभ पाश्चात्य जगात मध्य युगांतरच्या प्रबोधन काळात झाला हा १८ व्या शतकाचा काळ होय, आणि याच काळापासून स्त्री मुक्तीच्या अनुषंगाने विविध वेगवेगळे विचार आणि प्रवाह निर्माण झाले. त्यामध्ये उदारमतवादी स्त्रीवाद, समाजवादी स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद, मार्क्सवादी. पर्यावरणवादी स्त्रीवाद. इस्लामी स्त्रीवाद. इत्यादी प्रवाहांचा निर्देश करता येईल आणि भारत देशामध्ये गांधीयन स्त्रीवाद आणि आंबेडकर अशा काही स्त्री मुक्तीच्या प्रवाहांचा निर्देश केला जातो. मात्र इसवी सन पूर्व काळातच आपल्याकडे चार्वाक, बुद्धाने स्त्री समतेची भक्कम पायाभरणी केली होती. स्त्री पुरुषांमधली विषमता बुद्धाला मुळीच मान्य नव्हती. स्त्रीच्या स्वतंत्र व्यक्तित्वाची आणि तिच्या मानवी प्रतिष्ठेची प्रस्थापना भारताच्या इतिहासात बुद्धाने प्रथमच केली. महाप्रजापती गौतमी यशोधरा, खेमा, विशाखा, धम्मदिना पटाचारा अशा शेकडो स्त्रियांनी माणूस म्हणून स्वतःचे निर्माण बुद्धामुळे झाले. धम्माचे तत्वज्ञान समाजाला सांगण्याचा बौद्धिक अधिकार त्यांनी प्राप्त करून घेतला. स्त्रियांच्या जीवनात बुद्धाने ही अभूतपूर्वक क्रांती घडवून आणली होती. स्त्री धम्मात पूर्णपणे स्वतंत्र होती.

एकोणिसाव्या व्या शतकामध्ये सामाजिक क्रांतीचे आणि सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते जोतिबा यांनी स्त्री शक्तीला जीवंत करण्यासाठी अभूतपूर्वक कार्य केले. महात्मा जोतीबा फुले हे अखिल श् समाजाचे मुक्ती युद्ध आहेत. ज्यावेळी स्त्रीला शिक्षणाची दारे पूर्णतः बंद होते. अशा परिस्थितीत त्यांनी स्त्रियांसाठी शिक्षणाचे दारे पूर्णपणे मोकळे केले

समाजात अनेक वाईट रूढी परंपरा स्त्रियांच्या संदर्भात होत्या त्यामुळे या वाईट रूढी परंपरेतून जोपर्यंत स्त्री पूर्णपणे मोकळी होणार नाही तोपर्यंत तिला मोकळा श्वास घेता येणार नाही. तिला तिचे अस्तित्व. अस्मिता कळणार नाही. म्हणून ती आधी शिकल्या पाहिजे. हा विचार महात्मा जोतिबा फुलेंनी एकोणिसाव्या शतकामध्ये दिला जोतीरावांच्या शाळेत शिकणाऱ्या मुक्ता नावाच्या चौदा वर्षाच्या मातंग मुलीने एक निबंध लिहिला एकोणिसाव्या शतकातील ही पहिली स्त्री लेखिका म्हणजे फुलांच्या चळवळीची महान उपलब्धी आहे.

छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानांमध्ये स्त्रियांच्या परिवर्तनासाठी उत्थानासाठी आणि तिच्या संपूर्णतः स्वातंत्र्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील एकूण स्त्रियांना भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून मूलभूत अधिकार बहाल केले. तिला स्वतंत्र अभिव्यक्त होण्याचे अधिकार बहाल केले. असे असताना देखील या देशातील धर्मांध विषमतावादी समाज व्यवस्थेने धर्मग्रंथांचा आधार घेऊन स्त्रियांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. तिच्यावर अनेक रूढी,



CamScanner

 ISBN : 978-81-19931-43-9

परंपरेचे, चालीरीतीचे खोटे नाते ओझे तिच्या डोक्यावर लादले आणि तिला पुन्हा गुलाम केले गुलामीत जगणाऱ्या भारतीय स्त्रियांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांची अंधारातून उजेडाकडे घेऊन जाण्यासाठी क्रांती केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक आंदोलनाचा चळवळीचा आणि परिवर्तनवादी विचारांचा विचार आंबेडकरी साहित्यिकाने अगदी प्रखरपणे आंबेडकरी साहित्यात अभिव्यक्त केला. ज्या समाज व्यवस्थेने माणसाचे मनुष्यत्व पूर्णपणे नाकारले, अशा समाजव्यवस्थेला ठोकरीने उडवल्याशिवाय पर्याय नाही हा विचार त्यांच्या संघर्षातून आंबेडकरी अनुयायांना मिळाला. आंबेडकरवादी कविता ही स्त्रीवाद पुरुषवाद असा भेदाभेद करीत नाही, तर आंबेडकरी कविता या देशातील एकूण वंचित समूहाच्या परिवर्तनासाठी रस्त्यावर उतरणारी कविता आहे. हक्क, अधिकार प्राप्त करून देणारी कविता आहे. आंबेडकरी कविता ही काही आभाळातून पडत नाही, तर ती आंदोलनातून जन्म घेते. तिचा प्रवासच आंदोलनातून झालेला आहे. अशाच एका आंबेडकरवादी कवयित्री पुष्पा प्रकाश बोरकर यांनी 'अजूनही वेळ गेलेली नाही 'या कविता संग्रहाच्या माध्यमातून आंबेडकरी तत्वज्ञान आंबेडकरी संघर्ष आंदोलन लढे एकूणच या देशातील मानवाच्या सर्वांगीण उत्थानाच्या संदर्भात आपल्या कवितेच्या माध्यमातून शब्दबद्ध केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेले सामाजिक, सांस्कृतिक धार्मिक लढे आणि अशा आंदोलनातूनच त्यांच्या कवितेचा प्रवास सुरू झाला. आंबेडकरी आंदोलन साहित्य आणि कार्यकर्ता यांचे अन्योन्य असे संबंध आहे. आंबेडकरी आंदोलनातूनच आंबेडकरी कार्यकर्त्यांचा आणि साहित्याचा प्रवास सुरू झाला हे नाकारता येऊ शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह,पर्वतीमंदिर, अंबादेवी मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह एकूणच माणसांना सामाजिक दास्यातून कायमचे सोडवण्यासाठी संघर्ष उभारलेत. आंबेडकरी आंदोलनाचे साहित्याचे प्रेरणास्थान महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. वेदना, विद्रोह, नकार हे तीन सूत्र आंबेडकरी साहित्यात दिसून येतात. सोबतच आंबेडकरी आंदोलन, कार्यकर्ता आणि साहित्य हे देखील सूत्र आंबेडकरी साहित्यात दिसून येतात. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना प्रेरणास्थानी मानणाऱ्या प्रत्येकच कवीने बाबासाहेबांची या नात्या प्रकारे संवाद साधून आपल्या भावनांना अभिव्यक्त केले. यामध्ये कोणतेही प्रकारची अंधश्रद्धा नाही. कोणतेही प्रकारची भक्ती नाही. तर बाबासाहेबांचे प्रति मनात असलेली डोळस श्रद्धा साहित्यातून प्रकट होताना दिसते. बाबासाहेबांविषयी कृतज्ञता कवितांमधून अगदी स्वाभाविकपणे दिसून येते बाबासाहेब या पहिल्याच कवितेत कवित्री म्हणतात...

**" बाबा...!**
**सतरा गाठीच्या जिंदगीला मडवलास**
**जरतारी काशिद्याने**
**अन् नक्षीदार केलंस भंगार आयुष्य..."**

या देशातील विषमतावादी सामाजिक व्यवस्थेने हजारो वर्षांपासून मानवतेच्या अधिकारापासून दूर ठेवण्यात आलेल्या अपेक्षित, शोषित, वंचित बांधवांच्या जीवन जगणाऱ्या मानवाच्या आयुष्याचे भंगार झालेले दिसते. या भंगार आयुष्याला घडविण्याचे कांम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. या समाज व्यवस्थेने शोषित माणसाचे मनुष्यत्व नाकारले होते. अशा अभावग्रस्त समूहाच्या माणसांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माणूस म्हणून त्यांना मनुष्यत्व बहाल केले, ज्या माणसाचे, ज्या समूहाचे संपूर्ण आयुष्य या व्यवस्थेने नाकारले होते अशा नाकारलेल्या माणसांना बाबासाहेबांनी या समाज व्यवस्थेतून मुक्त केले. त्यांना चेहरा बहाल केला, माणूस म्हणून सन्मानाने जीवन जगण्याची अधिकार राज्यघटनेच्या माध्यमातून बहाल केले.

इतर कवयित्री प्रमाणे पुष्पाताई बोरकर यांनी सुद्धा स्त्री विषयक समस्यांना स्पर्श केला आहे. 'न स्त्री स्वातंत्र्य अर्हती' च्या मनुने लादलेल्या संस्कृतीने त्यांचे माणूसपण नाकारलेले हे हजारो वर्षे संस्कृतीने लागलेले विकृत भोग भारतीय स्त्री आजही भोगत आहे. आपल्या गुलामगिरीच्या गोडवे गाण्यात धन्यता मानणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण आजही खूप मोठ्या प्रमाणात आहे. संविधानाने त्यातून मुक्त केल्यानंतरही त्यांना त्या मानसिकतेतून बाहेर पडण्याचे धैर्य होत नाही. हे वास्तव आहे.

**बाबासाहेब –**
**या कवितेतून**
**अभिव्यक्त होताना**
**बाबा...!**
**तू तोडल्यास गुलामीच्या बेड्या**

 ISBN : 978-81-19931-43-9

कित्येक जन्माच्या–
सम्यक सम्बुध्दाची करूणा डोळ्यात साठवून–
घेऊन गेलास बोधिवृक्षाच्या छायेत–
बुद्धम् शरणम् गच्छामि च्या जयघोषात–

या देशातील अभाव ग्रस्त समूहाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्द दध धम्म बहाल केला. आणि खऱ्या अर्थाने आपली नाळ तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानाशी जोडली. हजारो वर्षांपासून गुलामीत पडलेल्या अभावग्रस्त समूहाला त्यांनी मुक्त केले. डॉ. बाबासाहेबांच्या कार्याला अतिशय ताकदीने आयुष्य समर्पण करणारी' रमाई' ह्या तितक्याच महत्त्वपूर्ण आहेत. कवयित्री 'रमाई' या कवितेतून अभिव्यक्त होताना म्हणतात...

रमाई
तू अथांग वात्सल्याची
करुणामयी जीवनशाला–
तुझा चंदनी देह झिजत गेला अन्
माझ्या करपलेल्या आयुष्याला नवा बहर आला–

खरंच आहे रमाबाईच्या संघर्षाला त्यागाला शब्दबद्ध करणे फार कठीण आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शिक्षण घेण्यासाठी जेव्हा परदेशात होते तेव्हा रमाबाईने त्यांच्या शिक्षणासाठी आपलं आयुष्य समर्पित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या देशातील अस्पृश्यता कायमची नष्ट करण्यासाठी संघर्ष करीत होते त्याच धर्तीवर रमाबाई त्यांना साथ देत होती. रमाबाई चंदनासारखी झिजत गेली आणि या देशातील अभावग्रस्त करपलेल्या महिलांच्या आयुष्याला नवचैतन्य देऊन गेली त्या माऊलीच्या संघर्षाने अभाव ग्रस्त महिलांचे आयुष्य उजळून गेले

कवयित्री पुष्पाताई बोरकर केवळ सामाजिक विषमते विषयीच अभिव्यक्त होताना दिसत नाही तर त्याचबरोबर अंतर्गत जे हेवेदावे आहेत त्याबद्दल अभिव्यक्त होताना दिसतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य या देशातील अपेक्षित शोषित अस्पृश्य समूहांना नवी ओळख बहाल करण्यासाठी आयुष्य पणाला लावले मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर जे काही सामाजिक, राजकीय परिस्थिती निर्माण झाली, त्या परिस्थितीमध्ये अनेक मातब्बर लोकांनी बाबासाहेबांच्या कार्यापेक्षा त्यांच्या नावाचा वापर जास्त केला एक प्रकारे बाबासाहेबांच्या नावाचा लीलाव केला. उपकाराची जाणीव नसणाऱ्या माणसांच्या टोळ्यांनी अभावग्रस्त समूहाला ओरबडून टाकले आहे, तेव्हा अशा दलालांच्या शर्यतीमध्ये मी माझं अस्तित्व जपत आहे.

कवयित्री पुष्पाताई बोरकर अतिशय गंभीरपणे विचार व्यक्त करतात, आंबेडकरी बांधवांची नाळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तथागत सिद्धार्थ गौतम बुद्ध पर्यंत जोडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या प्रत्येक आंदोलनामध्ये कवयित्रीला बाबासाहेबांच्या पावलांचे ठसे उमटलेले दिसतात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या ध्येयाने ज्या निष्ठेने संघर्ष केलेत आंदोलन केलेत ते आंदोलनाच्या पावलावर पाऊल ठेवून आंबेडकरी भीमसैनिकांनी क्रांती केली हे कार्यकर्ते या देशातील जे विषमतेचे वृक्ष होते ते वृक्ष उध्वस्त करण्यास गावागावांच्या वेशीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार पेरत होते.

क्रांतिवीरांनो ...!
"ज्या दिशेने पाऊल तुमचे पडत होते
त्यावेळी क्रांतिकारकांनो
प्रत्येक पावलावर बाबासाहेबांच्या पावलांचे ठसे मला दिसले
विषमतेचे वृक्ष उध्वस्त करण्यास गावागावाच्या विषयावर सूर्य पेरत निघाले होते.'

कवयित्री या देशातील तमाम आंबेडकरी महिलांना आवाहन करताना दिसतात. ज्या धर्माने स्त्रीचे स्त्रीत्व नाकारले त्या धर्माला ठोकरीने उडवण्याची वेळ आली आहे. जो धर्म बाईला बाईपण बहाल करत नाही, अशा धर्माला आपण जमीन दोस्त केलं पाहिजे. आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो बुद्ध धम्म दिला तो मानवतावादी धर्म होता. सामाजिक विषमतावादी व्यवस्थेने संस्कृतीने या देशातील उपेक्षित बांधवांचे शोषणच केले आहे. तेव्हा कवयित्री शाहिनबाग....।या कवितेतून तमाम आंबेडकरी शोषित स्त्रियांना संघर्षासाठी सिद्ध होण्यास, स्वतःला सिद्ध करावेच लागेल,

चल आता



CamScanner

 ISBN : 978-81-19931-43-9

रक्तपित्या संस्कृतीवर-
ते परिवर्तनाची गुढी उभारू
आणि नव्या पेशवाईला जमिनीत गाडून॥

आज विज्ञान युगात तंत्रज्ञानाने जी क्रांती केली त्यामुळे स्मार्टफोन लॅपटॉप इंटरनेट आले आधुनिक साहित्यात उत्तर आधुनिकतेचा प्रवाह आला आणि दुसरीकडे विवेकवादी मानवतावादी विचारांचे डॉक्टर नरेंद्र दाभोळकर, कॉम्रेड गोविंद पानसरे, प्राध्यापक कुलबुरगी, गौरी लंकेश, यांची दिवसाढवळ्या हत्या झाल्यात व रोहित वेमुला या विद्यार्थ्याला आत्महत्या करायला भाग पाडले. पुन्हा जवखेडा, सहारानपुर, भीमा कोरेगाव, मणीपूर येथे घडलेल्या घटना पाहून वाढत चाललेल्या सनातन आणि दहशतवाद आणि या सर्व घटनांचे हालहाल पसरत कवित्री एका चिंतनाकडे वळते आणि या देशातील स्त्रियांना आवर्जून सांगते की आपल्या अस्मितेसाठी झाटायची वेळ आली आहे.

आंबेडकरी विचार म्हणजे समता स्वातंत्र्य न्याय व बंधुतेचा पुरस्कार करणारा, आंबेडकर विचार म्हणजे स्त्री-पुरुष समतेचा आग्रह धरणारा, आणि अस्पृश्यता जातिभेद चातुर्वर्ण्य व्यवस्था नाकारणारा लोकशाही समाजवादाचा स्वीकार करणारा आहे.

जातीभेदामुळे हिंदू एक राष्ट्रीयत्वाचा भावनेस मुकला आहे. देशभक्ती व ऐक्याचे भावनेस पारखे झाले आहे. जातीभेद हा राष्ट्रीय एक्क्याचा वैरी आहे. असे मत बाबासाहेब मांडायचे. सर्वच समाजातील घटकांत आचार विचारांचे आदान प्रदान होणे आवश्यक आहे. एकात्मतेची भावना निर्माण होण्यासाठी समाजाच्या कार्यात समाजातील सर्व स्तरातील व्यक्तींनी भाग घ्यायला पाहिजे. इतरांचे अंतकरणातील भावभावनांशी समरस व्हायला हवा पण या भावनेचा अभाव हिंदू समाजात आहे हे बाबासाहेबाचे महत्वाचे आंबेडकरांनी तरुणांनी या सर्वांचे सूक्ष्म निश्लेषण करून समजून घेण्याची गरज आहे.

स्त्री मुक्तीवादी महिलांचा विचार मजूर घरकामगार मोलकरीण शेतात काम करणाऱ्या स्त्रिया कवयित्री पुष्पा बोरकर ह्या स्वतः कार्यकर्ते आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनामध्ये सक्रिय सहभागी होत्या. डॉ. बाबासाहेबांनंतर जे काही लढे, संघर्ष, आंदोलन मग नामांतराचा प्रश्न असो की माणसाला माणूस म्हणून सिद्ध करण्यासाठी असणारा संघर्ष असो, या सर्व संघर्षातून आंदोलनातून त्यांच्या कवितेचा जन्म झाला. कवयित्री ने आंदोलनातील सहभागसह त्यांच्या वाट्याला आलेल्या अनुभवांचे चिंतनाचे काव्यात्म अधोरेखनही स्वाभाविकपणे केले आहे.

**संदर्भ ग्रंथ**

मनोहर डॉ.यशवंत: डॉ. आंबेडकर आणि स्त्रीमुक्तीचे युद्ध, युग साक्षी प्रकाशन २६ जानेवारी २००६
मोरे प्रा.डॉ. सतेश्वर :अध्यक्ष भाषण तिसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन वर्धा, दिनांक २ जानेवारी २०११
डॉ. थोरात आशाताई :अध्यक्षीय भाषण: ग्रामीण आंबेडकरी साहित्य संमेलन, अंजनगाव बारी, जिल्हा अमरावती, दिनांक दोन तीन फेब्रुवारी २०१९
डॉ. मोरे सतेश्वर :प्रस्तावना :निलपंख कविता संग्रह
बोदिले सुनंदा संपादित मुक्त मंथन त्रैमासिक डिसेंबर जानेवारी फेब्रुवारी २०२३ अंक तिसरे
डॉ. अहिरे प्रतिभा, अध्यक्ष भाषण: पाचवे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन अकोला दिनांक २०,२१एप्रिल २०१३
खैरमोडे चांगदेव :डॉआंबेडकर आणि हिंदू कोड बिल सुगावा प्रकाशन पुणे फेब्रुवारी १९८७
प्रा. परदेशी प्रतिभा: जात आणि स्त्री शोषण हिंदू कोड बिल ते ऑनर किलिंग, दिनांक ६ डिसेंबर २०१९
डॉ. बाबासाहेब आंबेडकर: शूद्र पूर्वी कोण होते?

*****



CamScanner

Vidya Bharati Shaikshanik Mandal's

# Vidya Bharati Mahavidyalaya, Amravati

Re-accredited with Grade 'A' by the NAAC (CGPA 3.23 - Third Cycle)
College with Potential for Excellence (CPE Status Thrice by the UGC)
Star College Status by DBT, New Delhi, Mentor College under Paramarsh by UGC
Identified as Lead College by S.G.B. Amravati University, Amravati

## UGC Sponsored Multi-disciplinary National Conference on

## *Feminism in 21st Century: Breaking Barriers; Shaping Futures*

## २१ व्या शतकातील स्त्रीवाद : सीमोल्लंघन करूया; भविष्य घडवूया

**Date : Saturday, 27th July, 2024**

# CERTIFICATE

This is to certify that प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम, मराठी विभाग प्रमुख, श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय पुसद, जिल्हा. यवतमाळ has actively participated in the Conference on "Feminism in 21st Century : Breaking Barriers; Shaping Futures" held on 27th July, 2024 and has attended / presented a research paper entitled विषमतेचे वृक्ष उध्वस्त करणारी गावा गावाच्या वेशीवर सूर्य पेरणारी आंबेडकरी कविता : कवयित्री पुष्पा बोरकर.

Dr. G. D. Bansod
Jt. Organizing Secretary
Head, Department of Marathi
VBMV, Amravati

Dr. R. M. Patil
Organizing Secretary
Head, Department of English
VBMV, Amravati

Dr. Pradnya S. Yenkar
Convener, Principal,
Vidya Bharati Mahavidyalaya,
Camp, Amravati

VIDYA BHARATI MAHAVIDYALAYA College AMRAVATI

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## February - 2024

(CDLVII) 459

# Perspectives of Ambedkarism



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
**Dr. Santosh Bansod**
Co-ordinator
Dr. Ambedkar Studies Centre,
Sant Gadge Baba Amravati
University, Amravati

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar International Publication. Amravati.**

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

CamScanner

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान

प्रा.विक्रांत कृष्णराव मेश्राम
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय पुसद, जिल्हा. यवतमाळ,
९४०३४०५४९० vikrantmeshram1976@gmail.com

भारतीय संविधानातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रवास आणि प्रारंभावस्था आजच्या संशोधकाने, अभ्यासकांनी आणि भाष्य काराणे, विश्लेषणात्मक पातळीवर समजून घेणे आवश्यक आहे. जातीपातीचे, धर्माचे ,धर्मांधतेचा दृष्टिकोन टाळून एका नव्या दृष्टिकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे या देशातील नागरिकांसाठी भारतीय संविधानाच्या माध्यमातून दिलेले मूल्यात्मक अधिकार समता, स्वातंत्र्य, बंधुत्व ,सामाजिक न्याय, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक ,धार्मिक, शैक्षणिक मानवी मूल्यांच्या पातळीवर एका निकोप ,निर्लेप दृष्टिकोनातून त्यांचे योगदान समजून घेण्याचे आज नितांत आवश्यकता आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय संविधान समितीमध्ये प्रवेश करण्याच्या दृष्टिकोनातून तत्कालीन प्रतिगामी आणि राजकीय पक्षातील वरिष्ठ ,कनिष्ठ पदाधिकाऱ्यांनी अनेक प्रकारचे अडथळे निर्माण करून ठेवले होते. कोणतेही परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारतीय घटना समितीमध्ये प्रवेश होऊ नये, अशी तरतूद करण्यात आली होती, हे सर्वश्रुत आहेच.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली भारतीय राज्यघटना मुळात प्रतिगामी विचारवंतांना नकोशी झाली आहे. भारतीय संविधानांचा विरोध करणारे राजकीय पक्षातील लोक आपल्या राजकीय स्वार्थासाठी डॉं बाबासाहेब आंबेडकरांचा जयजयकार करतात आणि ज्यांना माणूस म्हणून सन्मानाने जीवन जगण्याचे अधिकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेत असेही समाजबांधव डॉ. आंबेडकरांचा जयजयकार करतात, वंचित उपेक्षित पिढीत अभावग्रस्त समूहाने जयजयकार करणे हे उपयुक्त आहे. हा विचारातला विरोधाभास आपण समजून घेणे नितांत गरजेचे आहे .शाळेच्या बाहेर बसणारा एक अस्पृश्य मुलगा या देशाची राज्यघटना लिहिली हेच मुळात या देशातील प्रतिगाम्यांना सहन होत नाही. भारतीय राज्यघटना सुपूर्द करण्यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेतील त्यांचे या देशातील नागरिकांना उद्देशून २५ नोव्हेंबर १९४९ केलेले भाषण अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतात जर लोकशाही टिकवायची असेल तर, या देशातील नागरिकांनी कोणते कर्तव्य आजजन्म पाळले पाहिजे, हे त्यांनी नमूद केले होते. कारण, भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून आपण लोकशाही स्वीकारणार आहोत, मात्र ही लोकशाही भारतासाठी काही नवीन नाही. तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धांच्या काळात लोकशाही अस्तित्वात होती, मात्र प्रतिगामी आणि परकीयांनी केलेल्या आक्रमणामुळे ती लोकशाही संपुष्टात आली. भारतीय संविधानाच्या माध्यमातून आपण जी लोकशाही स्वीकारणार आहोत ती ही टिकणार की नाही ,या संदर्भात त्यांनी खंत व्यक्त केली होती. प्रबुद्ध भारत या त्यांच्या वृत्तपत्रातून 'लोकशाहीचे भवितव्य ' या संदर्भात विचार मांडले होते. भारतीय संविधान हे कितपत योग्य आहे हे या देशातील शासनकर्ती लोकांवर अवलंबून आहे. भारतीय संविधान कितीही चांगला असून चालणार नाही तर या देशातील शासन कर्ती जमात हे किती चांगली आहे ,त्याच्यावर भारतीय लोकशाही अवलंबून राहील. भारतीय संविधान लोकशाही या देशातून हद्दपार होऊ नये, यासाठी या देशातील नागरिकांनी समता, स्वातंत्र्य, बंधुत्व धर्मनिरपेक्षेपणा जोपासणे आवश्यक आहे . आपल्या रोजच्या जीवनात आणि व्यवहारात ती अंगीकारली पाहिजे.समता आहे, मात्र स्वातंत्र्य नाही, बंधुत्व आहे पण स्वातंत्र्य नाही, समता आणि बंधुत्व नसेल तर लोकशाही कशी टिकणार, या संदर्भात त्यांनी सविस्तर असे विवेचन 'प्रबुद्ध भारत 'या वृत्तपत्रातून केले होते.



CamScanner

संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नाही तर ती प्रत्येक भारतीयांची जीवन संहिता आहे. त्यातील जीवनमूल्य आपल्या रोजच्या जीवनात व व्यवहारात आणणे हे आपले कर्तव्य आहे. देशाने मला काय दिले ,हा विचारण्याचा अधिकार जसा आपणास आहे, तसेच या देशासाठी मी काय केले हा प्रश्न स्वतःला केला पाहिजे. भारतीय संविधान लागू होण्यापूर्वी आपल्या देशात अनेक जाती जमाती, भाषा, संस्कृती होत्या. त्यांना एका सूत्रात बांधण्याची जबाबदारी भारतीय संविधानाने स्वीकारली आहे.( संपादकीय :संविधान विशेषांक -सप्टेंबर, ऑक्टोबर ,नोव्हेंबर २०२३, त्रैमासिक ,मुक्त मंथन पान नंबर ०२)

आंबेडकरी भाषिक,तत्त्वज्ञन डॉ. यशवंत मनोहर ,'संविधानाचे तत्त्वज्ञान आणि समान नागरी कायदा 'संदर्भात म्हणतात, शोषण सत्ताकाने देशाला मनुस्मृती नावाची दुर्घटना दिली आणि बाबासाहेब आंबेडकरांनी भारताला सर्वांगीण सलोख्याची घटना दिली, म्हणूनच बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृती जाळली. याचा अर्थ हा समाजाला गोठवणारा असामान कायदा झाला असा आहे. समाज-हास झाला. बाबासाहेबांनी संविधानाची निर्मिती केली आणि मनुचा अधिकार संपवला,( जनता १४ जानेवारी १९५० )याचा अर्थ मनुस्मृती आणि संविधान भारतीय नागरिकांना आता एकत्र नेता येणार नाही ,असा आहे. कारण, भारतात पायाभूत संघर्ष मनुस्मृती परंपरेचा असमान नागरिक कायदा हाच आहे. बाबासाहेबांनी मनुस्मृति दहन केले याचा अर्थ असमान नागरिकायदा जाळला आहे. मनुस्मृति या समान कायद्याचे शेकडो पुरावे आहेत.( मनोहर डॉ.यशवंत :संविधानाचे तत्त्वज्ञान आणि समान नागरी कायदा - त्रैमासिक मुक्त मंथन -संविधान विशेषांक ,सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२३)

पेशवे कालखंडामध्ये स्त्री आणि अस्पृश्य वर्गाला अत्यंत हीन दर्जाची वागणूक देण्यात येत असे, भारतातील इतर राज्यांमध्येही स्त्रियांचा व्यापार कमी अधिक प्रमाणात केला जात होता. परंतु पेशवे काळात स्त्रियांच्या व्यापारासाठी बुधवार पेठेची निर्मिती करण्यात आली होती. असा इतिहास सांगतो. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत कलम २३(१) अन्वये स्त्रियांच्या व्यापारास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कलम ३९( अ )नुसार जगण्याचे साधन सर्वांना समान उपलब्ध करून देण्याची तरतूद केली आहे.( कापडे डॉ.दीपक राज भारतीय संविधान स्त्रियांचा उद्धार -त्रैमासिक मुक्त मंथन मार्च ,एप्रिल, मे २०२३)

समान नागरी कायदा स्त्रियांच्या उद्धारासाठी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून केलेले कायदे महत्त्वपूर्ण आहेत .डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना समितीत येऊच नये अशी व्यवस्था तत्कालीन राजकीय पक्षांनी केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वप्रथम बंगाल विधान मंडळातून श्री जोगेंद्रनाथ मंडळ आणि इतर अनुसूचित जातीच्या सदस्यांच्या पाठिंब्यावर संविधान सभेत प्रवेश मिळवला .बंगालच्या फाळणीनंतर तो भाग पाकिस्तानात गेल्यामुळे बाबासाहेबांचे घटना समितीतील सदस्य रद्द झाले होते .ज्या तत्कालीन राजकीय पक्षांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना समितीत प्रवेशांचे सर्व मार्ग बंद केले होते .विरोध केला होता. त्या राजकीय पक्षांनी बाबासाहेबांच्या विद्वत्ते पुढे शरणागती पत्करून महाराष्ट्रातून बिनविरोध निवडून आणले. घटना समितीचे सदस्य झाल्यानंतर बाबासाहेबांची निवड घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून करण्यात आली.

१९४५ मध्ये द्वितीय महायुद्धाय समाप्त झाले आणि भारताच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाला प्राधान्य प्राप्त झाले .या प्रश्नावर विचार विनिमयासाठी ब्रिटिश शासनाने एक त्रीसदस्य शिष्टमंडळ भारतात पाठविले. हे शिष्टमंडळ सत्ता हस्तांतरणाचा निर्णय मार्ग पद्धती, प्रक्रिया आणि साधने सुचवण्याच्या हेतूने भारतात पाठवण्यात आले होते .या शिष्टमंडळाला ,'कॅबिनेट मिशन' असे संबोधण्यात आले होते. या कॅबिनेट मिशन ने १६ मार्च १९४६ रोजी सत्ता हस्तांतरणाची आपली योजना घोषित केली. भारताच्या भावी राज्यकारभार चालविण्याच्या दृष्टीने संविधान निर्मितीसाठी एक संविधान सभा स्थापन करण्यात यावी, असे या योजनेत सूचित करण्यात आले होते. त्या प्रस्तावानुसार संविधान सभेच्या स्थापनेसाठी निवडणुका घेण्यात आल्या, संविधान सभेवर सदस्यांचे निर्वाचन प्रांतीय



CamScanner

विधानमंडळाच्या निर्वाचित सदस्याद्वारे करण्यात आले. कॉंग्रेसच्या विरोधामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुंबई विधान मंडळातून निर्वाचित होऊ शकले नाहीत. त्यामुळे त्यांनी बंगाल विधानमंडळातून श्री जोगेंद्रनाथ मंडळ आणि इतर अनुसूचित जातीच्या सदस्यांच्या पाठिंबावर संविधान सभेत प्रवेश मिळवला.

समारोप ळ:भारतीय घटना समितीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रवास, प्रारंभ आजच्या नवीन अभ्यासकांपुढे येणे गरजेचे आहे .भारतीय घटना समितीत निवडून येण्यासाठी कॉंग्रेस पक्षाने , रचलेले षड्यंत्र हे समजून घेणे महत्त्वाचे आहे आणि शेवटी कॉंग्रेस पक्षांनी मुंबई प्रांतातून बिनविरोध केलेली निवड हे देखील समजून घेणे तितकेच गरजेचे आहे. भारतीय संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्वी भाष्य करणारे विस ते बावीस सदस्य असताना देखील नकळतपणे त्यांच्या अगोदर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत व्यक्त करण्यासाठी घेण्यात आले. प्राचारण करण्यात आले, आणि त्यांना बोलण्यासाठी फक्त दहा मिनिटे देण्यात आली होती. हा सर्व प्रकार पाहता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भारतीय संविधानातील प्रवेश आणि त्यांचे विरोधात रचलेले षड्यंत्र याची मूल्यात्मकता जाणवते .

**संदर्भ ग्रंथ**

१)आंबेडकर डॉ. बाबासाहेब :संविधान सभेतील भाषणे आणि चर्चा ,प्रकाशक: प्रबुद्ध भारत, पुस्तकालय ,नागपूर, १७
संकलन :भारत वाघमारे


२)मुक्तमंथन ,मार्च, एप्रिल, मे२०२३,

३) त्रैमासिक :मुक्त मंथन ,सप्टेंबर ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२४



CamScanner


ISBN 978-81-953708-7-0



# Research and Development

# संशोधन आणि विकास

Edited By
Dr. Pavan Mandavkar
Dr. Veera Mandavkar



Edited Reference Book
Published by a Government
Recognized National Level Publisher
der Peer Review System as per UGC Guidelines.

CamScanner

ISBN 978-81-953708-7-0

# Research and Development

**(Edited Book as per UGC Norms by National Level Publisher)**

# संशोधन आणि विकास

**Chief Editor**

**Dr. Pavan Mandavkar**

Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb

**Associate Editor**

**Dr. Veera Mandavkar**

Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre (DBMRC)

**Dr. Bhau Mandavkar Research Centre**

Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal

Maharashtra 445 401 (India)

9422867658, 9403014885

researchjournalofindia@gmail.com

marathipradhyapak@gmail.com

CamScanner

# वैदर्भीय आंबेडकरी कविता : जागतिकीकरण वास्तव व दाहकता

**प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम**
मराठी विभाग प्रमुख
श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय
पुसद, जिल्हा यवतमाळ, महाराष्ट्र
ई-मेल vikrantmeshram1976@gmail.com Mobile: ८७८८७११४८४

## प्रस्तावना :

जागतिकीकरणाचा सर्वात आधी जो बळी गेला तो म्हणजे या देशातील शेतकरी गिरणीतील कामगार फूटपातावर लहान लहान धंदे करणारे व उद्याची सुंदर स्वप्ने मेंदूत घेऊन गर्द काळोखात झोपलेला लहान लहान दुकाने हे तर आज अदृश्य झाली आहेत आणि जगातील जे काही छोटी छोटी व्यवसाय आहेत आणि ती करणारे व्यक्ती अशा सर्व व्यक्तींना व व्यवसायांना मोठ्या व्यवसायाने अर्थात जागतिक करणारे गिळंकृत केले आहे

जागतिकी करण म्हणजे एक आभाळ भव्य अजगर त्याही पुढे जाऊन एक प्रकारचा डायनासोर ॲनाकोंडा जो आपली भूक मिटवण्यासाठी लहान लहान जीव जंतूंना भक्ष करतो आपल्या भुकेचा शिकार बनवतो जागतिकीकरणात या देशातील कामगार शेतकरी गिरणी कामगार शेतमजूर कोरडवाहू शेतकरी कमी जमीन असलेले शेतकरी हमाल रस्त्याच्या कडेला बसून आपली उदरनिर्वाहाची साधने विकणारे आपल्या व आपल्या कुटुंबाचे उद्याचे दिवस सुंदर करण्यासाठी पोट तिडकीने संपूर्ण आयुष्य पणाला लावणारे माणसांना वाहून नेणारा



राबणारा रिक्षा चालक असेल लोड गाडीवर भाजी विक्रेता दूध विक्रेता असेल अशा लहान लहान व्यवसायातून उदरनिर्वाह करणारे धंदेवाईक आज जवळपास संपण्याचा जमा झाली आहेत सर्वसामान्य माणसांचे संपूर्ण आयुष्यात कमानीचा बदल झाला त्याबद्दलचे वास्तव व दहा चित्र जगातल्या सर्वच साहित्यातून प्रस्फोटीत झाले आहेत होत आहेत जगातील सर्वच साहित्य प्रवाहात जागतिकीकरणाचा त्यांच्या लेखणीवर प्रभाव दिसून येतो जगात व समाजात जे काही चुकीचं होत आहे त्याला डोळसपणे पाहणे व आपल्या लेखणीच्या माध्यमातून त्याच्यावर आवाज उचलणे व सर्वसामान्य माणसं या देशांमध्ये तसे व्यवस्थित जीवन जातील यासाठी लेखकांची फार मोठी जबाबदारी आहे हे जबाबदारी इतर साहित्यांबरोबरच वैदर्भीय आंबेडकरी कवींनी आपल्या कवितेच्या माध्यमातून जागतिकीकरणाची प्रक्रिया प्रारंभ वास्तव व दाहकता आपल्या कवितेतून अधोरेखित केले आहेत करीत आहेत यामध्ये यवतमाळ जिल्ह्यातीलडॉक्टर महेंद्र भवरे आनंद गायकवाड लक्ष्मीकांत घुमे अमरावती जिल्ह्यातील सुदाम सोनवणे पुष्पाताई बोरकर मायाताई वासनिक नागपुर जिल्ह्यातील महेंद्र गायकवाड युवराज सोनटक्के अकोला जिल्ह्यातील अशोक इंगळे चंद्रपूर जिल्ह्यातील डॉक्टर विद्याधर बनसोड गोंदिया जिल्ह्यातील युवराज गंगाराम भंडारा जिल्ह्यातील सुरेश खोब्रागडे आणि वाशिम जिल्ह्यातील सर्जेराव चव्हाण या विदर्भातील काही निवडक आंबेडकरी कवींच्या कवितेतून जागतिकीकरणाचा सर्वसामान्य माणसावर जो कमालीचा परिणाम झाला त्याचा वास्तव 10 चित्र त्यांनी आपल्या कवितेतून रेखाटले आहे अभिव्यक्त केले आहे या जागतिकी करणांमध्ये सर्वसामान्य माणूस हा कसा सुरक्षित राहील व त्याच्यावर होणारे त्याला नकळत असणारे असे सर्व हल्ले कसे झोपवता येईल यासाठी वैदर्भीय आंबेडकरी कवींच्या कवितेतून वास्तव चित्र रेखाटण्याचा प्रयत्न करीत आहे.



CamScanner

## जागतिकीकरणाचा प्रारंभ :

जागतिकीकरणाची प्रक्रिया भारतामध्ये सर्वसाधारण 1990 पासून सुरू झाली डॉक्टर आनंद तेलतुंबडे यांच्या म्हणण्यानुसार"भारताने नऊ उदारमतवादी धोरणाचा औपचारिक अवलंब जुलै 1991 मध्ये केला असला तरी त्याची सुरुवात ही 1980 च्या मध्यातच झाली" सातव्या पंचवार्षिक योजनेत या प्रक्रियेचा स्पष्ट प्रभाव अभावग्रस्त शोषित वंचित उपेक्षित जमाती यांच्यावर पडला वाढती बेरोजगारी भूकमारी गरीबीने प्रचंड प्रमाणात उच्चांक काढला अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांनी देखील अशाच प्रकारची शंका उपस्थित केली आहे ते म्हणतात," जगात नेत्रदीपक श्रीमंती आहे ;आणि चिंताजनक दारिद्र्यही आहे" समकालीन जीवनात अभूतपूर्व अशी संपन्नता आहे आणि आज संसाधने ज्ञान आणि तंत्रज्ञान यावर जो अधिकार आपण गृहीत धरतो त्याची कल्पना करणे सुद्धा आपल्या पूर्वजांना शक्य झाले नसते

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेच्या समस्येतून या देशातील सर्व सामान्य माणसांची मुक्तता कशी होईल हा विचार इतर साहित्यांबरोबरच निवडक संदर्भात काही वैदर्भीय आंबेडकरी कवींनी आपल्या कवितेतून प्रभावीपणे मांडला आहे आंबेडकरी साहित्याची प्रेरणा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आहेत हे सर्वश्रुतच आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर 1956 नागपूर येथे अस्पृश्य वंचित शोषित समूहांना बुद्ध धम्माची दीक्षा देऊन माणूस म्हणून मान्यता प्राप्त करून दिली त्याहीपूर्वी मनुस्मृती दहन 14 तळ्याचा सत्याग्रह अभावग्रस्त समूहाने मानवी मूल्याची जाणीव करून देणे आंबेडकर साहित्य आणि देव ईश्वर धर्मा परमेश्वर आत्मा परमात्मा अंधश्रद्धा चर्मकार पारंपरिक रूढी परंपरा विज्ञानवादी दृष्टिकोनातून नाकारणे आणि मानवाच्या सर्वांगीण उन्नतीचे मार्ग शोधले दुसरीकडे



जागतिकीकरणात धर्मांध शक्ती मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य समूहाचे मानवी मूल्य उध्वस्त करताना दिसत आहे कर्मकांड अंधश्रद्धा रूढी परंपरा यातून आजही बंदिस्त आहे हे बंदिस्त माणसाची मुक्तता झाली पाहिजे तो ही विज्ञानवादी झाला पाहिजे जे शाश्वत आहे ते त्याला कळले पाहिजे हा विचार जागतिक साहित्य बरोबर वैदर्भीय आंबेडकरी कवींनी देखील आपल्या कवितेतून प्रकल्पने मांडलेला आहे यांसाठी प्रबोधनाच्या माध्यमातून व विचाराच्या माध्यमातून आंबेडकरी कविता आपली भूमिका निष्ठेने पार पाडत आहे साध्या सोप्या भाषेत जागतिकीकरण म्हणजे अर्थव्यवस्थेला मुक्त संचार करून देणे व जो याच्या आड येईल त्याला संपवणे ह्या संपविण्याच्या प्रक्रियेत माणसाची अस्तित्व सिद्ध करण्यासाठी आंबेडकरी कविता कटिबद्ध आहे.

## जागतिकीकरणाची व्याख्या :

आंबेडकरी तत्त्वचिंतक उत्तम कांबळे, "वैश्विकीकरण म्हणजे दुसरे तिसरे काही नाही, तर समाजातल्या बहुसंख्य वर्गाचा दमछाक करण्यासाठी मांडलेला नवाखेळ, नवे षड्यंत्र आहे".

आंबेडकरी भाष्यकार का तत्त्वचिंतक प्रा. सतेश्वर मोरे चिंतनाच्या पातळीवर भाष्य करताना, अभिव्यक्त होतात," ग्लोबलायझेशन हा केवळ वैश्विक बाजारपेठेचा विषय नाही. तर मानवी जाणवेच्या कक्षेला आणि त्यातून उभ्या होणाऱ्या सांस्कृतिक विषयाला आपल्या कवेत घेऊन, मानवी विश्वाचे विघटन करणाऱ्या एका सुनियोजित भांडवली युगाचा षडयंत्राचा हा विषय आहे. या युगाने मानवी समूहाच्या एका वर्गाला सगळी सुबत्ता दिली, संवादाची वेगवेगळी साधने दिले, बाजारात त्यांची कृत्रिम ऐपत निर्माण केली. त्याला हवा असलेला भ्रामक सामाजिक दर्जा दिला. तो धरून जगाशी



CamScanner

संवाद करू शकतो. जग त्याच्याजवळ आहे, पण या जगातला माणूस मात्र त्यांच्यापासून दूर गेला आहे". (प्रस्तावना वेळेवर येणारे इतर विषय पृष्ठ क्रमांक 23) आंबेडकरी समीक्षक डॉ. अशोक पळवेकर "जागतिक पातळीवर महासत्तांनी त्यांच्या देशातील लोकांना अतिशय जीवनमान जगता यावे यासाठी इतरांच्या शोषणावर आधारित असलेली ही यंत्रणा जाणीवपूर्वक निर्माण केली आहे"

या देशातील तमाम अभावग्रस्त माणसांना समूहांना या जागतिकीकरणाच्या विळख्यातून कसे बाहेर काढता येईल, याची जाणीवपूर्वक नोंद आंबेडकरवादी कवी, साहित्यिक, लेखक यांनी घेतली आहे .आणि या साहित्यातून वंचित, उपेक्षितवर्ग जागतिकीकरणाच्या जाळ्यातून तो बाहेर पडला पाहिजे. नाहीतर संपूर्ण जाळीसहित त्याने उंच आकाशात भरारी घेतली पाहिजे. इतकी ताकद त्याच्यात निर्माण करण्याची जाणीव आंबेडकरवादी कवितेने स्वीकारली आहे. त्यातल्या त्यात वैदर्भीय आंबेडकरवादी कवींच्या कवितेमधून देखील ही जाणीव प्रस्फूटीत होताना दिसते आहे. माणूस जिवंत आहे, म्हणजे नेमके काय आहे, त्याचे जिवंतपणाची व्याख्या नेमकी काय आहे, तो कशासाठी जगतो, तो सकाळी कशासाठी उठतो.

**जाणीव :**

आपल्या देशामध्ये जागतिकीकरणाला सुरुवात १९९० पासून सुरू झाले. आणि जवळजवळ दोन दशके जागतिकीकरण म्हणजे काय हे समजून घेण्यासाठी किंवा समजण्यासाठी कोणतेही पर्याय नव्हते. पण जेव्हा या जागतिकीकरणाचा दुष्प्रभाव पडायला सुरुवात झाली. तेव्हा हळूहळू या देशातील अभावग्रस्त समूहांना लक्षात आले. त्यांना जागतिकीकरणाची जाणीव झाली. आणि या जागतिकीकरणांमध्ये आपण नाडल्या जात आहोत ही जाणीव प्रथम त्यांच्या लक्षात आंबेडकरवादी कवितेच्या माध्यमातून लक्षात आली. जागतिकीकरणाच्या



पूर्वी या देशातील वंचित, उपेक्षित ,अभावग्रस्त माणसाचे खिशात जितके पैसे असायचे त्या पैशाचे नियोजन असायचे, पण आता एटीएम, क्रेडिट कार्ड उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांच्या खिशातले पैसे त्यांची इच्छा नसतानाही कसे संपून जातात, हे त्यांच्या लक्षात येत नाही. या जागतिकीकरणाने सर्वसामान्य माणसाला सर्वत्र बाजूने नाढवले आहे. कवी आनंद गायकवाड यांच्या 'इस्तो' कवितासंग्रहातून....

सतीत्वाचे मठं उभे झाले
मठामधून नेते आले
नेते नेते एक झाले
राजाकडे सारे गेले,
राजा म्हणे करार करा
जग सारे बाजार करा
बाजाराचा शेज़ार झाला
शेजार पाजार बेजार झाला.
कंपनीची दवाई खेडोपाडी बाजारात
सरकारचा जावई कंपनीच्या विजारात,
कंपनीने जगाचे एक मोठ्ठे खेडे केले
कारपासून बारची
खेड्यामध्ये जत्रा आली
जत्रा मे कचरा बिठाया
प्लास्टिक मे आया पानी
दुनिया भई कंपनी
डॉलर की मनमानी.
डॉलर जाते कॉलर येते
कवड्या येते कलर जाते
सेझ खाई नांगराची उमेद

नगरं जाळणाऱ्या इंद्राचा
हा नवा वेद.
नगर महानगर शहर ग्राम
देशाचे झाले नंदिग्राम,
कंपनीचे आलू कांदे
कंपनीचा भाजीपाला
(कविता: नमो तस्सं जस्सं होईल तस्सं, पृ.१५)

कविता: शिवाजी

सरकार,
हे आर्ट ऑफ लिव्हिंग
कोणत्या धोतरातून घुसवायचं
कोणत्या खिशातून बाहेर काढायचं
कोणत्या चॅनेलवर दिसेल
आमच्या सुखाची सहारा सिटी
इज्जतीचं कार्ड मशीनमध्ये घातलं की
बाहेर पडतात वेदना
(पृ.२६)

कविता: ब्राह्मण

एका सिलीकॉन व्हॅलीत
एक गरीब ब्राह्मण रहात होता
कॉम्प्युटरवर भविष्य सांगायचा,
वेदाची विज्ञानाशी सांगड घालून
महायज्ञानाचे नियोजन करायचा!
(पृ. ७)

कवी : अशोक इंगळे, आयडेंटिटीचे ब्रँडेड युद्ध हे कविता संग्रह १९ फेब्रुवारी २०२२ ला प्रकाशित झाले या कवितासंग्रहाच्या माध्यमातून



कवी अशोक इंगळे यांनी जागतिकीकरणाच्या संदर्भात अजून मी थांबलो नाही, पुन्हा पुन्हा अणूरेणुचा शोध घेत,ई-कागदावरची कविता एक आयडिया,तुझ्या स्वागतासाठी, जागतिकीकरणाची दशसूत्री,येथून पुढे,रमाई,लढण्याचा मार्ग, गावाच्या इंस्टंट प्रगतीसाठी...

तूर्तास, अजून मी थांबलो नाही
अजून आटले नाहीत
माझ्या पायाखालचे खोल खोल झरे
थकल्या नाहीत माझ्या रक्ताळलेल्या पाऊलवाटा
तुटली नाही बेंबीपासून शब्दांची नाळ
मला प्रदीप्त करायचा आहे ग्लोबलायझेशन काळ. (पृ.२३)

हे मजुराच्या रक्तावर फुगलेले बिल्डरचे पोट
हे ब्रोकर्स खातात मलाई कोफ्ता
हे कमिशनवर उघडणारे मेडिकल स्टोअर्स
हे डॉक्टरांच्या व्हिजिटसाठी ताटकळलेले एम. आर
दात खातात वेटिंग लिस्टवरील पेशंटवर
या पाचशे केबल वाहिन्या वाहून येतात नग्न संवेदना आजच्या
ग्लोबलव्हिलेजमध्ये. (पृ.२७)

महासत्तेच्या स्पर्धेत धावण्यासाठी
गावाने पकडलाय वेग
कालीपिलीचा.
म्हणून
गावाच्या उत्थानाचा आलेख झळकतो
डिजिटल पोस्टर्सच्या होल्डिंगवर .
आता, गाव कुठलेही एका पक्षात नाही
(पृ. ५९)

जगातील परिवर्तनवादी दीपस्तंभाना



CamScanner

वैश्विक खेड्यातील नव्या माणसांना. (पृ. ६४)
रमाई तू बाबासाहेबांच्या महासंगणकाचा माऊस
जिने पचवला मृत्यूचा पाऊस
नि अजरामर ठरली
'थॉट्स ऑन पाकिस्तान 'च्या
अर्पण पत्रिकेत.
रमाई तू ग्लोबल युगाच्या साच्यात
न बसणारी
पत्नी धर्म आड न आणता
दुःखाचा उजेड करून हसणारी.
(पृ. ९१)

जाणीव
आंबेडकरी विचारांचे क्षेपणास्त्र घेऊन
मी सहज फिरतो आहे
या व्यवस्थेवर प्रहार करण्यासाठी.
(कवितासंग्रह :युद्धपक्षी ,कविता: जाणीव पृष्ठ दोन)

या दुनियेत
कबीरा, तुझे 'दोहे' गळ्यात अडकवून
शहरभर हिंडावे असे दिवस उरले नाहीत
ज्योतिबा, तुमचे 'अखंड' गळाभरून गुणगुणावेत
असेही दिवस आता उरले नाहीत
यार तुकाराम, तुझ्या 'अभंगाचा' तर हल्ली फक्त
धंदा म्हणून कीर्तनासाठी उपयोग केला जातो
खरं तर इथे तुमच्या नावाने 'सत्यप्रबोधन'
होतांना दिसतच नाही
फक्त तुमच्या नावाने येथे सर्वत्र



हवशे, नवशे आणि गवश्यांचीच जत्रा भरताना दिसते एकंदरीत कुठेच
हिरवळ दिसत नाही.
(युद्धपक्षी, कविता: या दुनियेत, पृष्ठ सात)

कवी विद्याधर बनसोडे यांनी' इवान',' वर्तमानाचा सातबारा',' सूर्याला दिवस जातात तेव्हा', 'प्रश्न पाणी बदलण्याचा आहे', 'फिनिक्स पक्षांच्या कविता' या कवितासंग्रहाच्या माध्यमातून त्यांनी जागतिकीकरणात आंबेडकरवादी कवितेवर झालेला परिणाम अभिव्यक्त केला आहे.

'इवान' या कवितासंग्रहातून....

हे माझ्यापुढून धावत जाणारे नवे शतक
माणसांच्या खांद्यावर जुन्या प्रश्नांचे ओझे
त्यात
मशीन सारखी धावत जाणारी माणसे
उरफुटेस्तोवर धावत जाण्याची स्पर्धा
अर्धा रोबोट; माणूस अर्धा
या शतकाने
माझ्या ओंजळीत दिलेले प्रश्नायन
माझ्या भोवती प्रश्न.. प्रश्न.. प्रश्न
मी करत बसतो पोस्टमार्टम
या प्रश्नांचे
(पृ. १०)

जग एक खेडं झालंय
ते म्हणतात
त्यांच्या ग्लोबल व्हिलेजमध्ये
आता माणसं भेटतात
बिनपाण्याच्या नळासारखे



CamScanner

कपड्याच्या दुकानातल्या
सूटबुटातल्या पुतळ्यांसारखे
सुंदर देखणे चकचकीत सुशिक्षित
ई-मेल फिमेलच्या भाषेत बोलणारी

(पृ. ३३)

वर्तमानाचा सातबारा या कवितासंग्रहातून
शिकले पोरं वाचत असतात
पानठेल्यावरच्या पेपरच्या जाहिराती
पेपरमध्ये जाहिरातींचे पीक यावे
पण सन्मानाने जगण्याचे दरवाजे बंद व्हावे
जिथे राबणाऱ्या बापाने
तरुण पोराच्या प्रेताला खांदा द्यावे.

(पृ. ६७)

इतक्यात माणसांची उंची फार कमी झाली यार
माणूस आता रोबोट होतोय्
गाड्यांच्या धुरांड्यात
माणूस आता धूर होतोय्....

(कवितासंग्रह : सूर्याला दिवस जातात तेव्हा, कविता: शरण, पृ. ४४)

मेली तर ही खुशाल मरू द्या खुरटी झुडपे,
उंच, देखणी झाडे जगली म्हणजे झाले...
मेली तर ही खुशाल भरू द्या मुंग्या, झुरळे
कळसावरती कळस चढू द्या म्हणजे झाले!

(कवितासंग्रह : प्रश्न पाणी बदलण्याचा आहे, कविता: खेळ, पृष्ठ नऊ)

कवी सुरेश खोब्रागडे यांच्या वेळेवर येणारे इतर विषय या कवितासंग्रहाच्या माध्यमातून त्यांनी जागतिकीकरणाचा आंबेडकरवादी कवितेवर झालेला परिणाम अभिव्यक्त केले आहे. यामध्ये गावभर धुके



पसरले आहे, आताशा मी खूप दूर गेलोय, डेंजर झोन, वेळेवर येणारे इतर विषय, एखाद्या बेवारस कुत्र्यांच्या केकटण्याशिवाय, हे माझ्या पुरातन सखे, हे माझ्या प्रिय ग्लोबल देशा, एम्प्रेस मिल ते एम्प्रेस मॉल ,माणूस डस्टबिन का होऊ पाहतो...

आताशा कुणीच कुणाला स्पष्ट दिसत नाहीत.
गाव फार धुक्यात हरवलाय
तो गजबज, तो सुखाचा गोंधळ
तो साराच समूहातला आकांत
हे ...हे सारे आता संपल्यात जमा झालेत.
स्मशान शांतता, भयान काळोख, मायेचा दुरावा याशिवाय फारसं काही
उरलं नाही गावात.
ग्लोबलायझेशनच्या या दुनियेत
माझ्या गावातील माणूस
माझ्यापासून फार दूर गेलाय
..... आणि माझी सावलीसुद्धा!

(पृ. ४४)

आता कुणाच्या भाकरीच्या तुकड्यावर
कुणाची चटणी
आता सवयच झाली जणू
तुकड्यावर जगण्याची तुकड्यावर मरण्याची
गयोबलायझेसनच्या काळात सारे देश
आज जवळ आलेत

(पृ. ३६)

या ग्लोबल युगात हरवत चाललेह सारं
भ्रमणध्वनी ,फेसबुक ,व्हाट्स ॲप, व्हिडिओ कॉन्फरसिंग, मेसेजेस

इत्यादी इत्यादी कितीतरी संवादाची साधनं आजूबाजूला तरीही मी खूप
दूर गेलोय आपल्याच माणसांपासून इंटरनेटवर सर्च करतोय माझी
माणसं, माझा गाव पण हतबल होऊन थकतात माझे डोळे

(पृ. ५३)

एखाद्या बेवारस कुत्र्याच्या केकाटण्याशिवाय
आज कुणीच नाही चौकात गाव कधी जागतिकतेच्या आगीत भस्म
झालाय
काहीच कळले नाही.

(पृ. ५०)

'मील' आणि 'मॉल' यांच्यातील
काना,मात्रा,वेलांटीचा सहसंबंध
आमच्या देशात
भांडवलदारांच्या संदर्भात बोललं तरी कर्फ्यु लागतो
नि मोर्चात मजुरांना नाहक बळी जावं लागतं .
गांधारीने डोळ्यांवर पट्टी बांधली होती म्हणे!
गांधीजींच्या बंदराचं काय झालं साऱ्या दुनियेला माहितेय.
मार्क्स,
जीव गेला तरी बेहतर
मी माझा चेहरा झाकू शकत नाही!

(पृ. १०२)

मेली तर ही खुशाल मरू द्या खुरटी झुडपे
उंच, देखणी झाडे जगली म्हणजे झाले....
मेली तर ही खुशल मरू द्या मुंग्या, झुरळे
कळसावरती कळस चढू द्या म्हणजे झाले !
(कवितासंग्रह: प्रश्न पाणी बदलण्याचा आहे, कविता: खेळ, पृष्ठ ९)



चला धरा कुदळ, फावडे आणि करुणेची माती
काय हे जग असेच फाटलेले राहणार आहे...?
प्रत्येक भूकंपानंतर जुळत असतं मातीचं काळीज
माणूस म्हणून ही भूमी सर्वांना पुरेल की नाही ...?
(कवितासंग्रह : प्रश्न पाणी बदलण्याचा आहे, कविता : डीवायडींग लाईन पृ. १९)

कवी युवराज सोनटक्के जागतिकीकरणाच्या संदर्भात त्यांच्या प्रश्नांची मातृभाषा या कविता संग्रहातून अभिव्यक्त होतात.

एकीकडे बाजार - शानशौकत लुटणारी मदांध माया
दुसरीकडे दुःखप्रद संकटे झेलणारी दुबळी दुनिया
बाजारवादाने निरागस निष्ठावान भोगती नैतिक पतन
जाहीर लिलावात विकली जाते इमानदारीचे तन - मन विदेशी
साम्राज्यवादाने बहाल केलेल्या
या गुळगुळीत 'बाजार' शब्दावरून
घरंगळत गेलो आम्ही अनेकदा
सौंदर्यबोधाला आमुच्या बाजारवाद करतो कुत्सित
घट्ट क्षमतामुलक मुळांना छाटून करतो सीमित.

(पृ. ४४)

मी उभा एकाएकी वैश्विक समाजाचे दृश्य बघत -
पहाटे- पहाटे खात्या-पित्या घरचे
अनेक संभ्रमित चेहरे
पार्क -उद्यान- खेळाच्या मैदानाकडे
धावणाऱ्या रस्त्यांवरून फिरणारे
मांजराने पाठलाग करणाऱ्या उंदरांसारखे
सुसाट काही धावणारे .

उच्च रक्तदाब, मधुमेह ,कोलेस्ट्रॉल
आधी व्याधींनी ग्रासलेले
बाजारवादाच्या विष-दंशांनी आणि त्रासलेले.
(पृ. ४२)

कवी महेंद्र गायकवाड यांच्या काजव्यांच्या खांद्यावर संगिनी पोलीस ठेवलेली माणसे अस्तित्व गमावलेली माणसे जगणे असह्य झाले या कवितासंग्रहाच्या माध्यमातून त्यांनी जागतिकीकरणाचा अवैध घेतलेला आहे त्यापैकी त्यांच्या ताजव्यांच्या खांद्यावर संगीत या कवितासंग्रहातून

अन्नासाठी धडपडणारी माणसे ,
माणुसकीचे अस्तित्व शोधताशोधता
लचके तोडून खांद्ऱ्या खाताहेत
म्हणून शिलालेख कोरलेल्या इतिहासाचे
अन् ह्या जगाचे काय होईल?
हिजड्याच्या तालमृदंगावर
मुन्नीबाईच्या कोट्यावर नाचताना
मानाचा मुजरा घ्यावा लागेल
तेव्हा देशीविदेशी विषारी नाग संगिनी रोखून
ओथंबलेल्या स्तनाशी चाळे करतील
आणि घटाघटा दूध पितील
हा दिवस दूर नाही!
(पृष्ठ क्रमांक आठ)

क्रांतीनंतर
प्रत्येकाने नि:श्वास टाकला.
आता सर्व बदल आपल्या अपेक्षेप्रमाणे



आणि लोकशाहीच्या एक मत, एक मूल्यप्रमाणे-
नव्या आशा शाबूत.
पण सत्तेसाठी हपापलेल्यांनी एवढेच औचित्य साधले अन् माणसाला
बोन्साय करून टाकले.
त्याचे काय?
(पृ. १४)

गारुड्याने
सर्प मंगुसाची लढाई सुरू होतहे
असे क्षणोक्षणी आमीष दाखवून,
टोपलीतील सर्पाला गायब केले .
आणि आता गारुडी
गावातील माणसांना गायब करताहेत.
(पृ. २२)

जागतिकीकरणामुळे खाजगीकरण झाले.
आणि रोजगाराचे पेटंट घेतले.
डंकेल!
तुझा इरादा नेक नाही.
त्यामुळे मी छिन्नी ,हातोडा घेऊन फिरतोय.
(पृ. २५)

धर्म पेरत रहा
या मातीत -
मूलतत्त्ववाद उगवेल
सुगीच्या दिवसांत
कणसातल्या दाण्याप्रमाणे
टिपता येईल माणसाला.
(कवितासंग्रह :ओलीस ठेवलेली माणसे, कविता : धर्माच्या, पृष्ठ २२)

जगणे असाय झाले या कवितासंग्रहातून जागतिकीकरणावर भाष्य करणाऱ्या कविता आहेत त्यामध्ये पृथ्वी ,लोकहो, षडयंत्र ,आरपार ,शोषक, पुनर्वसन, मानसिकता, स्वप्ने ,शहर इत्यादी

सावकारी पाशाने करीताहेत शेतकरी आत्महत्या
ठेकेदार ठिय्यावर लावतो कष्टकऱ्यांची बोली
स्वच्छानिवृत्तीची लटकताहे तलवार
जागतिकीकरणाचा नवा वार
कामगार कमी करा
रोबो भरा ,

(पृ. ९)

...युग संपले.
नवे तंत्र -यंत्रयुग आले.
माणसांना रिटायर्ड केले.
न्यूटन,
तुझ्या गतीच्या सिद्धांताचे काय झाले?

(पृ. ११)

जागतिकीकरणाने वेढा दिला माणसाला
आदळताहेत दुःखांच्या लाटा
यातनेच्या वाटा
कशा दिसतात ?
पिकासो,
ही विहंग दृश्य कॅनव्हासवर काढशील ना!

(पृ. १२)

मॉडेल मिलच्या जागेवर
भांडवलदाराने पायाभरणी केली
आणि पुन्हा एकदा मील मजुराचा बळी गेला



मॉल संस्कृती
लुटताहे गि-हाइकाला
फ्री गिफ्टची लालच देऊन
ओढताहे बाजारवाद
शोषकाचे प्रतिनिधित्व करताहे
प्रत्येक देश पोसताहे
माणसाला निळंकृत करण्यासाठी

(पृ .१३)

सुंदर माणसांचे
किती कुरूप झाले शहर!
भुकेकंगाल /भिकारी/ कचराकुंडीत अन्न शोधणारी मुले/ हॉटेलतील वेटर
इथे ऐतखाऊ/ शोषकांची थिएटर
धर्मांध /जातीयता/ सांप्रदायिकतेची विषारी झरे पाझरली शहरात
अन् माणसे कालकथित झालीत
सौंदर्यकरण/ चौकांचे/ नामकरण/ अनावरणासाठी उत्सुक झाले पुतळे
उपोषण/ मूक मोर्चा /शोकसभेसाठी
कष्टकरी एकत्र जमले शहरात
केव्हाही क्रांती होऊ शकते.

(पृ. ५२)

अस्तित्व गमावलेली माणसे या कवितासंग्रहातून जागतिकीकरणाचा वेध घेताना काही कविता जागतिकीकरण, मजूर, नायक, निषेध, बदल, बंड

आपण परिस्थितीनुसार
उसवलेले कपडे शिवून अंग झाकतो
ते रॅम्पवर चालतात
निर्लज्जपणे अंगप्रदर्शन करीत, त्यांचे काय?



CamScanner

(कवितासंग्रह : अस्तित्व गमावलेली माणसे, कविता : पृ. ७०)

## संदर्भ :


१. सेन अमर्त्य : अस्मिता आणि हिंसाचार नियतीविषयी भ्रम पेंग्विन बुक्स, नवी दिल्ली, २००९ पृष्ठ क्रमांक २३.

२. तेलतुंबडे आनंद :जागतिकीकरण आणि समाजवादाचे भवितव्य, ऊर्जा श्रमिक मुखपत्र स्मरणिका, २००७ पृष्ठ क्रमांक २३१.

३. कांबळे उत्तम :जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न ,ऊर्जा श्रमिक मुखपत्र स्मरणिका २००० पृष्ठ क्रमांक १५.

४. पळवेकर अशोक :जागतिकीकरण: साहित्य समाज आणि सांस्कृतिक पर्यावरण, ऊर्जा श्रमिक मुखपत्र स्मरणिका २००७ पृष्ठ क्रमांक १५३.

५. दुबे अशोक :(संपा) भारत का भूमंडलिकरण पृष्ठ क्र.२१.

६. थोरात सुखदेव :दलित निरंतर, विषमता आणि दारिद्र्य, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे २००७ पृष्ठ क्र.२२४.

७. काळे अरुण :नंतर आलेले लोक ,लोकवाङ्मयगृह ,मुंबई २००६.

८. भवरे महेंद्र: महासत्तेचे पीडादान, मुंबई २००५ मनोगत.

९. कांबळे उत्तम: जागतिकीकरणात माझी कविता, सुगावा प्रकाशन पुणे २००६ पृष्ठ क्र ९.

१०. कांबळे उत्तम :(संपा)जागतिकीकरणात मराठी कविता, परचुरे प्रकाशन मुंबई २००९ पृष्ठ क्र ४१.

११. भवरे महेंद्र: मराठी कवितेचे नव्या दिशा, प्रकाशक लोक वाड्मय गृह मुंबई.

१२. मोरे सतेश्वर: प्रस्तावना, कवितासंग्रह,वेळेवर येणारे इतर विषय, पृष्ठ क्रमांक २३.





१३. कांबळे उत्तम :आंबेडकर साहित्य, व्दारा.विक्रांत कृष्णराव मेश्राम,प्रकाशक आशय: आंबेडकरी साहित्य, संस्कृती व संवर्धन मंच ,बडनेरा अमरावती.

१४. मोरे सतेश्वर : अध्यक्ष भाषण : तिसरे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन वर्धा, पृष्ठ क्र. ५.

१७. बनसोड मंगेश: अध्यक्षीय भाषण: सातवे आंबेडकर युवा साहित्य संमेलन यवतमाळ,

१८. कांबळे उत्तम :जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न, १५ सप्टेंबर २००२, सुगावा प्रकाशन, पुणे.

१९. पिंपळापुरे केतन: अध्यक्षीय भाषण: आंबेडकर विद्यार्थी साहित्य संमेलन अमरावती, २००८.

२०. पाटील म.सू: दलित कविता व दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र, पद्मगंधा प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती २०१०.

२१. इंगळे डॉ. अशोक: नव्वदोत्तर आंबेडकरी कवितेची मीमांसा, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर.

२२. पाटील डॉ.विलास:नामांतर संघर्ष गाथा, सुधीर प्रकाशन वर्धा, १४ एप्रिल २०२४.

२३. मस्के डॉ. बी .आर.: विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, नभप्रकाशन अमरावती १४ एप्रिल २०१२.

२४. ढाले राजा : दलिते पँथरची संस्थापना :वस्तुस्थिती आणि विपर्यास, प्रकाशक: फुले- आंबेडकर विचार प्रसार केंद्र पुणे, ६ डिसेंबर २०२२.

२५. जाधव. रा.ग.: साठोत्तरी मराठी कविता व कवी ,साकेत प्रकाशन औरंगाबाद.

२६. भवरे .डॉ. महेंद्र :दलित कवितेतील नवे प्रवाह, शब्दालय प्रकाशन ,श्रीरामपूर.





CamScanner

२७. खंडेराव हरीश : आंबेडकरी चळवळ आणि साहित्य सांस्कृतीक इतिहास, खंड १, प्रज्ञा प्रकाशन उल्हासनगर जिल्हा. ठाणे २०१२.

२८. वानखडे डॉ. कैलास :दलित कवितेची निर्मिती प्रक्रिया, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, १४ जानेवारी २०१९.

२९. नागदिवे रोहन:स्थितीचा ओला कोलाज, यथार्थ प्रकाशन बडनेरा -अमरावती,३१ मार्च २००७.

३०. थोरात डॉ. आशाताई : अध्यक्षीय भाषण ग्रामीण आंबेडकर साहित्य संमेलन, दि.२,३फेब्रुवारी २०१९, अंजनगाव बारी, जिल्हा .अमरावती.

३१. गायकवाड आनंद : अध्यक्षीय भाषण राज्यस्तरीय आंबेडकरी साहित्य संमेलन उमरखेड, यवतमाळ

३२. कांबळे डॉ. ऋषिकेश :दलित कविता आणि अमेरिकन ब्लॅक पोएट्री ,गोदा प्रकाशन .औरंगाबाद.

३३. कांबळे उत्तम: अध्यक्षीय भाषण तेरावे कामगार साहित्य संमेलन, दिनांक २० व २२जानेवारी २००६ अमरावती.

३४. शेंडे डॉ. वसंत : अध्यक्षीय भाषण आंबेडकर साहित्य संमेलन ,दिनांक २६ एप्रिल २०१९ अकोला.

३५. खोब्रागडे प्रा. दीपककुमार : अध्यक्षीय भाषण पहिले अखिल भारतीय आंबेडकरवादी साहित्य संमेलन चिमूर, जिल्हा चंद्रपूर.

३६. मनोहर डॉ.यशवंत :दलित साहित्याचे नामांतर आंबेडकरवादी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन नागपूर, ६डिसेंबर २००५.

३७. अहिरे डॉ. प्रतिभा : अध्यक्षीय भाषण पाचवे आंबेडकरी युवा साहित्य संमेलन अकोला. दिनांक २०२१ एप्रिल २०१३.



३८. अजमेरा सूर्यकांता ,उपर्वट विनोद (संपा), जागतिकीकरण आणि मराठी भाषा, अथर्व पब्लिकेशन, धुळे २०११.

३९. गायकवाड शरद, शिंदे सुनील ( संपा), जागतिकीकरण आणि मराठी साहित्य, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे २००९.

४०. पंडित नलिनी : जागतिकीकरण आणि भारत, लोक वाङ्मय गृह, मुंबई २००४.

४१. भागवत विष्णू :जागतिकीकरण नवीन गुलामगिरी, समता प्रकाशन नागपूर, तृतीय आवृत्ती २००७.

४२. शोभणे रवींद्र (संपा), जागतीकरण समाज आणि मराठी साहित्य, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती २०१२.

❖❖❖



CamScanner